# षोडशोपचार पूजा पद्धति

## सोळा संस्कार व यज्ञ करण्याची पद्धति



५२०० वर्षांच्या दीर्घ काळानंतर श्री मद्भगवद्गीतेची शाश्वत
व्याख्या असलेल्या 'यथार्थ गीते' च्या सौजन्याने.

# षोडशोपचार पूजा पद्धति
## सोळा संस्कार व यज्ञ
## करण्याची पद्धति

*लेखक :*
परमपूज्य श्रीपरमहंसजी महाराजांच्या कृपा-प्रसादाने
**स्वामी श्री अड़गड़ानन्दजी**
श्री परमहंस आश्रम शक्तेषगढ़
ग्राम-पत्रालय – शक्तेषगढ़, जिल्हा – मीरजापुर
उत्तर प्रदेश, भारत

प्रकाशक :
**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**
न्यू अपोलो ईस्टेट, गाळा नं. ५, मोगरा लेन, (रेलवे सब-वे च्या जवळ),
अंधेरी पूर्व, मुम्बई - ४०००६९ (भारत) भारत.

# धर्म-संदेश

मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामांच्याही हजारो वर्षे आधी भारतातील वैदिक-कालीनऋषि-मुनींनीकठोरतपश्चर्याकरून,अनवरतप्रयत्नांचेफलस्वरूप असलेल्या त्या एकमेव परमात्म्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आणि संपूर्ण भारतातील अरण्यांमध्ये आश्रम स्थापित करून शिष्य-परंपरेमध्ये ते सत्य जतन करून ठेवले. पाच हजार वर्षांपूर्वीचे तेच सत्य भगवान श्रीकृष्णाने पुन्हा दृढ केले. त्यांनी सांगितले की एक आत्माच सत्य आहे, बाकी सर्व नश्वर आहे, अस्तित्वहीन आहे. हा उपदेश त्यांनी समस्त मानवमात्राला संबोधून केला. विश्वभरामधील नंतर आलेल्या महापुरुषांनी हाच उपदेश जसाच्या तसा उद्धृत केला व वेगवेगळ्या भाषांमध्ये प्रस्तुत केला. अहुरमज्दा, गॉड, अल्ला इत्यादि अनेक नावे केवळ एका परमात्म्याचाच बोध करवितात. ते सर्व महापुरुष सत्याचेच अनुयायी आहेत. त्या एकमेव परमात्म्याला प्राप्त करण्याची क्रिया म्हणजे 'धर्म' होय. धर्म एकच आहे. तेव्हा धर्मनिरपेक्षतेच्या नावाने घोषणा देणारे लोक भ्रमित झालेले आहेत असे वाटते कारण एकापेक्षा अधिक संख्या असते तेव्हाच पक्ष-अपक्ष हा प्रश्न उद्भवतो. धर्माबद्दलचे रहस्य चांगल्या प्रकारे जाणण्यासाठी व त्याचा योग्य अर्थ प्राप्त करण्यासाठी '**यथार्थ गीता**' हे पुस्तक अवश्य वाचावे. गीतेनुसार धर्माबद्दलची पूर्ण माहिती त्यात मिळेल. तेच मानवाचे एकमेव शास्त्र आहे.

ईश्वर कोण आहे? कोठे रहातो? त्यास कसे प्राप्त करावे? अशा प्रश्नांच्या उत्तरांसाठी '**यथार्थ गीता**' जरूर वाचा.

**निवेदक - भक्तमंडळ**

# गुरू - वंदना

।। ॐ श्री सद्गुरुदेव भगवान् की जय।।

जय सद्गुरुदेवं, परमानन्दं, अमर शरीरं अविकारी।
निर्गुण निर्मूलं, धरि स्थूलं, काटन शूलं भवभारी।।


सूरत निज सोहं, कलिमल खोहं, जनमन मोहन छविभारी।
अमरापुर वासी, सब सुखराशी, सदा एकरस निर्विकारी।।

अनुभव गम्भीरा, मति के धीरा, अलख फकीरा अवतारी।
योगी अद्वेष्टा, त्रिकाल द्रष्टा, केवल पद आनन्दकारी।।

चित्रकूटहिं आयो, अद्वैत लखायो, अनुसुइया आसन मारी।
श्री परमहंस स्वामी, अन्तर्यामी, हैं बड़नामी संसारी।।

हंसन हितकारी, जग पगुधारी, गर्व प्रहारी उपकारी।
सत्-पंथ चलायो, भरम मिटायो, रूप लखायो करारी।।

यह शिष्य है तेरो, करत निहोरो, मोपर हेरो प्रणधारी।
जय सद्गुरु.........भारी।।




श्री श्री १००८ श्री स्वामी परमानन्दजी महाराज ( परमहंसजी )
जन्म: शुभ सम्वत् विक्रम १९६९ ( १९११ ई. )
महाप्रयाण ज्येष्ठ शुक्ल ७, २०२६, दिनांक २३/०५/१९६९ ई.
परमहंस आश्रम अनुसुइया, चित्रकूट



श्री स्वामी अड़गड़ानन्द जी महाराज

# कर्मकांड?

'कर्मकांड' हा मूर्खपणा नसून मानवी-जीवनाची
ती अनिवार्य आवश्यकता आहे.

पण 'कर्मकांड' म्हणजे नेमके काय?

ते प्रत्येक माणसाच्या हृदयापर्यंत पोहोचविणे
हे पुरोहितांचे उद्दिष्ट असावे.

*-स्वामी अड़गड़ानन्द*



**एकं शास्त्रं देवकीपुत्र गीतम्**
**एको देवो देवकीपुत्र एव।**
**एको मंत्रस्तस्य नामानि यानि**
**कर्माप्येकं तस्य देवस्य सेवा।।**

*-भगवान वेदव्यास*

अर्थात एकच असे शास्त्र आहे जे देवकीपुत्र भगवान मुखातून गायले गेले आहे. या त्याच्या गीतात आत्मा हेच सत्य सांगितले आहे. आत्म्याशिवाय दुसरे काहीही शाश्वत नाही. या गीतेमध्ये महायोगेश्वराने कशाचा जप करायला सांगितला? ओमचा! अर्जुना, ओम अक्षय परमात्म्याचे नाव आहे. त्याचा जप कर आणि ध्यान माझे कर. कर्म एकच आहे–गीतेमध्ये वर्णन केलेल्या परमदेव, एका परमात्म्याची सेवा! त्या परमात्म्याला श्रद्धेने हृदयात धारण करा. सारांश सुरुवातीपासूनच गीता आपले शास्त्र आहे.

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ-संख्या |
|---|---|
| पूर्वपीठिका | १ |
| न्यास | १० |
| मंगलपाठ (पुण्याहवाचन) | १७ |
| षोडशोपचार पूजन-पद्धति | १८ |
| हवन-पद्धति | २९ |
| षोडश संस्कार | ३७ |
| निष्कर्ष | ४२ |

# पूर्वपीठिका

'संस्कार' हा शब्द प्राचीन वैदिक साहित्यात आढळत नाही, परंतु वेदांगाच्या सूत्र साहित्यात ह्या शब्दाचा प्रयोग बऱ्याच प्रमाणात केला गेलेला आहे. महर्षि जैमिनींच्या 'पूर्व मीमांसा' ह्या तत्त्वज्ञानावर भाष्य करताना शबर स्वामींनी लिहीले आहे, '**संस्कारो नाम स भवति यस्मिन् जाते पदार्थो भवति योग्यः कस्यचिदर्थस्य**' अर्थात् 'संस्कार' म्हणजे ती क्रिया ज्यामुळे एखादा पदार्थ विशिष्ट कार्यासाठी योग्य बनतो.

'संस्कार' चा शब्दाशः अर्थ आहे सः अंश आकार. 'सः' म्हणजे परमात्मा – वास्तविक प्रत्येक मुलामध्ये त्याचा अंशात्मक आकार रूजविणे म्हणजे संस्कार. जीवनात घडणाऱ्या प्रत्येक घटनेच्यावेळी पुरोहित येऊन यजमानाला शिकवीतो की परमात्मा एकच आहे. त्यास जाणले पाहिजे म्हणून त्याचेच स्मरण करावे. प्रत्येक संस्काराच्यावेळी अशा अर्थाची सूत्रे म्हटली जातात की परमात्मा एक आहे, तोच सत्य आहे, सनातन आहे, म्हणून त्याचे स्मरण करा. ह्यासाठी 'गीता' हेच संपूर्ण शास्त्र आहे.

संस्कारामुळे शारीरिक विकृतींचे निवारण, आत्म–निग्रह, एकमेकांना सहकार्य, शास्त्रानुरूप कर्म करण्याची योग्यता ह्या गोष्टींबरोबरच मानवाचे शरीर ब्रह्माच्या प्राप्तीच्या योग्य बनविले जाते. प्रत्येक मानवाच्या मनामध्ये ईश्वराचे अंशात्मक बीजारोपण करणे हे संस्कारांचे मुख्य उद्दिष्ट असते. संस्कार संपादित करण्याने नैतिक व सांस्कृतिक विकासही होतो, मनोरंजन–सजावट करण्यासाठी अवसर प्राप्त होतो, जबाबदारीची व सामाजिक बांधिलकीची जाणीवही होते.

गर्भाधानापासून मृत्युपर्यंत तसेच मृत्युच्या पश्चात् केल्या जाणाऱ्या सर्व संस्कारांची माहिती कल्पसूत्रांमध्ये दिलेली आहे. 'कल्प' म्हणजे वेदविहित कर्मांची क्रमपूर्वक कल्पना करणारे शास्त्र. विवाह, उपनयन इत्यादि संस्कारांचे तसेच यज्ञ नियमांचे क्रमवार वर्णन करणाऱ्या ग्रंथांना 'कल्प' म्हणतात. 'सूत्र' म्हणजे संक्षेप. अशाप्रकारे कल्पसूत्र म्हणजे यज्ञादि नियमांना संक्षेपाने सांगणे. कल्पसूत्र चार प्रकारचे आहे – १) श्रौत सूत्र १) गृह्य सूत्र ३) धर्म सूत्र ४) शुल्व सूत्र. 'श्रौत' सूत्रामध्ये वैदिक संहितांच्या यज्ञादि नियमांचे संक्षिप्त विवरण दिलेले आहे. गृहस्थ जीवनाशी संबंधीत विधिपूर्वक धर्मकृत्यांची माहिती 'गृह्य' सूत्रांमध्ये आहे. 'धर्म' सूत्र हा सामाजिक जीवनातील रीतरिवाज वा कायदा ह्यांचा आदिग्रंथ आहे. 'शुल्व' सूत्रामध्ये दोरीच्या सहाय्याने मोजून वेदी तयार करण्याचे नियम दिलेले आहेत.

वरील सूत्रांपैकी 'गृह्य' सूत्रामध्ये बेचाळीस संस्कारांचे वर्णन आहे. परंतु गौतम धर्मसूत्रामध्ये चाळीसच संस्कार दिलेले आहेत - १) गर्भाधान २) पुंसवन ३) सीमन्तोन्नयन ४) जातकर्म ५) नामकरण ६) उष्टावण ७) जावळ काढणे ८) उपनयन ९) ते १२) पर्यंत चार वेद व्रते ( महानाम्नी, महाव्रत, उपनिषद व्रत, गोदान) १३) समावर्तन (सोडमुंज) १४) ते १९) पर्यंत पाच महायज्ञ (देवयज्ञ, पितृयज्ञ, नृयज्ञ, भूतयज्ञ, ब्रह्मयज्ञ) २०) ते २६) पर्यंत सात पाकयज्ञ (अष्टका, पार्वण, स्थालीपाक, श्रावणी, आग्रहायणी, चैत्री, आश्वयुजी), २७) ते ३३) पर्यंत सात हविर्यज्ञ (अग्न्याधान, अग्निहोत्र, दशपूर्णमास, आग्रयणेष्टी, चातुर्मास, पशुबंध, सौत्रामणि) तसेच ३४) ते ४०) पर्यंत सात सोमयज्ञ (अग्नीष्टोम, अतिरात्र, अत्याग्निष्टोम, आप्तोर्याम, उक्थ्य, वाजपेय, षोडशी).

सूत्रकार व स्मृतिकार ह्या दोघांमध्ये संस्कारांच्या संख्येसंबंधी एकमत नाही. महर्षि अंगीरा पंचवीस संस्कार मानतात तर महर्षि व्यासांच्यामते सोळा संस्कार आहेत. मनु आणि याज्ञवल्क्य ह्यांनी अंत्येष्टि हा ही एक संस्कार मानला आहे. व्यासस्मृतिमध्ये निष्क्रमण, कर्णवेध आणि विद्यारंभ ह्यांसही संस्कार म्हणून गणले आहे. वैखानसांनी गर्भाधानाच्या आधी करण्यात येणाऱ्या ऋतु संगमन अथवा चतुर्थी होमालाही संस्कार म्हटले आहे. महर्षि वशिष्ठांनी गर्भाच्या रक्षणासाठी आठव्या महिन्यात करण्यात येणाऱ्या विष्णुबलि तसेच पूर्ण दिवस भरून प्रसूति सूकर व्हावी ह्यासाठी करण्यात येणारे सोष्यन्ती कर्म ह्यांचीही चर्चा केलेली आहे. गर्भाधानापासून विवाह पर्यंतचे सोळा अथवा अठरा संस्कार कायिक आहेत तर बाकीचे संस्कार यज्ञपरक आहेत.

गर्भाधान म्हणजे पतिद्वारा पत्नीची शुक्रधारणा करविणे. पुंसवन म्हणजे पुत्रप्राप्तीची कामना करणे. सीमन्तोन्नयन मध्ये गर्भाच्या रक्षणाच्या हेतूने स्त्रीच्या भांगेमधील केसांचे उन्नयन केले जाते. जातकर्म म्हणजे नवजात बालकाची नाळ कापून त्यास आंघोळ घालणे, तूप-मध चाटविणे व दिर्घायुष्याची कामना करणे. जन्मानंतर बाराव्या दिवशी बाळाचे बारसे केले जाते व त्याची नक्षत्र नाम, गुप्त नाम, ज्ञात नाम, यज्ञ नाम अशी चार नावे ठेवली जातात. निष्क्रमण अथवा सूर्यदर्शनाच्या दिवशी बाळ बाळंतीणीला प्रसूतिगृहातून घरी जाण्याची परवानगी दिली जाते. सहाव्या महिन्यात बाळाचे उष्टावण केले जाते तेव्हा बाळ अन्न ग्रहण करण्यायोग्य होते. धर्मसूत्रांमध्ये बकरीचे मास अथवा मासे खावयास घालण्याबद्दलही लिहिलेले आहे. वर्षगांठ, अब्दपूर्ति अथवा जन्मदिवस साजरा करण्याबद्दल शांखायन, बोधायन, गोभिल इत्यादिंनी चर्चा केली आहे. जावळ

काढणे म्हणजे लहान मुलाच्या डोक्यावरचे मूळचे केस कापणे व ते केस गुप्त ठिकाणी पुरून ठेवणे. एक ते पाच वर्षापर्यंत कधीही कान टोचणे व पाचव्या वर्षी विद्यारंभ करण्याची परंपरा आहे. उपनयन (मुंज) संस्कारामध्ये कटिसूत्र, जानवे घातले जाते व गायत्री मंत्र शिकविला जातो. वेदारंभाची चार वेद व्रते ही अध्ययनाच्या चार पायऱ्या आहेत. गोदान संस्कार हा ब्रह्मचर्य व्रताच्या समापनाचा सूचक आहे. समावर्तन संस्कार म्हणजे अध्ययन संपवून गुरुकुलातून स्वगृही प्रस्थान करणे होय.

विवाह संस्कार म्हणजे संतति प्राप्तीच्या हेतूने वर आणि कन्येचा पति-पत्नीच्या रूपात गृहस्थाश्रमामध्ये प्रवेश. अग्नीला साक्ष ठेऊन लाजाहोम, सप्तपदी, कन्यादान, ऐरणीदान इत्यादि विधि झाल्यावर वराने कन्येला तिच्या वडिलांच्या घरून घेऊन जाणे म्हणजे विवाह. आपस्तम्ब धर्मसूत्रामध्ये लग्नाचा वर्षसण साजरा करण्याबद्दल सांगितले आहे. व्यक्तिचे वय ऐंशी वर्षे व आठ महिने झाले की त्या व्यक्तिस ब्रह्मशरीर म्हटले जाते व त्याचे सहस्त्रचंद्रदर्शन केले जाते कारण त्याने त्याच्या आयुष्यभरात एक हजार पौर्णिमा बघितलेल्या असतात.

आजकाल सर्वच जातीमध्ये विवाह व अंत्येष्टि सोडून इतर संस्कार केले जात नाहीत. गर्भाधान टेस्ट-ट्यूबमध्ये, जन्म इस्पितळांमध्ये, शिक्षण कान्व्हेंट शाळेत, विवाह कोर्टामध्ये व शवदाह विद्युत शवदाहिनीमध्ये असे होऊ लागले आहे. जन्मदिवशी केक कापणे व गिफ्टस् घेणे हे ख्रिश्चन धर्माच्या प्रभावामुळे आलेले आहे. अशा ह्या सरळ, सोप्या पद्धतिमुळेही संस्कार व त्यांना पोषक असलेल्या स्मृतिंचा लोप होऊ लागला आहे. तसेच संस्कार केले नाहीत तर प्रायश्चित घ्यावयास शास्त्रामध्ये सांगितलेले आहे.

वास्तविक मनुष्याच्या जीवनात घडणारी प्रत्येक घटना म्हणजे एक 'कांड' (प्रकरण) आहे व प्रत्येक घटनेमध्ये मनुष्याला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देणे म्हणजे 'कर्मकांड' होय. प्रत्येक परिवारात घटना घडत असतात. कोणाकडे जन्म होतो तर कोणाकडे मृत्यु. कोणाकडे विवाह कार्य असते तर कोणाकडे उष्टावणाचा कार्यक्रम. कोणी गृह-निष्क्रमण करते तर कोणी गृहप्रवेश. भारतीय विद्वानांनी मानवी जीवनात घडणाऱ्या ह्या स्वाभाविक घटनांपैकी पंधरा-सोळा घटना निवडल्या व त्या घटनांच्या निमित्ताने प्रत्येक घरामध्ये जाऊन एकमेव परमात्म्याच्या अंशात्मक आकाराचे बिजारोपण करण्यासाठी षोडश संस्कारांची पद्धत चालू केली. गर्भावस्थेपासूनच प्रत्येक मुलामध्ये परमात्मा केवळ एक आहे

हा संस्कार रुजवणे व त्या एकमेव परमात्म्याला प्राप्त करणे हेच तूझे कर्म आहे ह्याची जाणीव करून देणे - हेच शुद्ध कर्मकांड होय.

घरो-घरी जाऊन शाश्वत एकमात्र परमात्म्याची जाणीव प्रत्येकाला करून देणे हे वैदिक युगातील पुरोहिताचे कर्तव्य असे. वर दिलेल्या घटनांच्यावेळी वेदांमधील पुरुष-सूक्ताच्या ऋचा म्हटल्या जायच्या व त्याबरोबरच मनुष्याला प्रिय असणाऱ्या वस्तू, प्रिय भोजन, विडा, नवीन वस्त्र, सुगंधी द्रव्ये दिली जात असत की ज्यामुळे ह्या वस्तूंचा उपभोग घेतानाही त्या एकमेव परमात्म्याला प्राप्त करणे ह्या आपल्या ध्येयाची आठवण राहील. प्रत्येक वस्तूचा वापर करताना परमात्म्याच्या विभूतिंचे स्मरण व्हावे हा त्यामागील उद्देश असे. ह्या मंत्रांच्या शेवटी अर्घ्यम, पाद्यम्, नैवेद्यम् असे म्हणून पुरोहित भगवंताचे हात-पाय धुण्याची कल्पना करत व प्रत्येक वस्तू त्या भगवंतासाठी केली जात असे. वास्तविक ना भगवंताचे हात-पाय धुतले जायचे ना पुरोहित स्वतःचे हात-पाय धुवायचे, उलट यजमान अज्ञानी असल्यामुळे ज्या परिवारात कांड घडत असे त्या परिवाराच्या मुख्य सदस्याचे हात-पाय धुतले जात असत. ह्याचा आशय केवळ इतकाच की हात-पाय धुताना, पाणी पिताना, भोजन करताना, वस्त्र-गंध-शय्या किंबहुना मंगल अथवा अमंगल अशा प्रत्येक वस्तूचा उपभोग घेताना त्या परमप्रभूच्या विविध अवस्थांचे (विभूतींचे) चिंतन व्हावे. ह्या वस्तू हृदयस्थ परमात्म्याला अर्पित केल्या जायच्या, हात-पाय धुतले जायचे, त्यामुळे प्रत्येक मुलाला समजेल की कोणीतरी परमात्मा त्याच्या हृदयामध्ये आहे ज्याला त्यास जाणावयाचे आहे. प्रत्येक मनुष्य, प्रत्येक मूल शाश्वत असणाऱ्या परमात्म्याला प्राप्त करेल, सर्वांचे कल्याण होईल व ध्येयापासून भरकटण्याची संधी मिळणार नाही.

हे स्पष्ट सांगणे जरुरीचे आहे की धर्माचे केवळ एकच उद्दिष्ट आहे व ते म्हणजे - जन्म-मृत्युच्या चक्रातून सुटका करून शाश्वत शांतिचा शोध घेणे. ही शांति सर्वत्र व्यापून असलेल्या त्या एकमात्र शाश्वत परमात्म्यामध्येच आहे व त्यास शोधण्यासाठी प्रत्येक मनुष्याला अंतर्मुख होऊन हृदयामध्ये उतरले पाहिजे.

ह्याच एकमेव परमात्म्याच्या विभूतींचे चित्रण वेदांमधील पुरुष-सूक्तामध्ये केलेले आहे, 'पुरुष-सूक्त' ह्या नावालाही विशेष अर्थ आहे - 'पुरः शेते इति पुरुषः' - तो हृदयरूपी नगरामध्ये (पूर) निवास करतो, म्हणून त्या परमपुरुषाला शोधण्याचे ठिकाण हृदय-देश आहे, बाहेर नाही. आजही कर्मकांडाच्या नावाने पुरुष-सूक्तातील मंत्रच म्हटले जातात, परंतु जन-सामान्यांना संस्कृत भाषा समजत नसल्या कारणाने त्यांना त्या मंत्रांचा आशय कळत नाही.

तेव्हा प्रत्येक पुरोहिताने ह्या ऋचांचा आशय बोली भाषेमध्ये समजावून ही जाणिव करून दिली पाहिजे की परमात्मा केवळ एकच आहे व तो शाश्वत आहे. ब्रह्मासकट सर्व जग नाशिवंत आहे. ब्रह्मापासून उत्पन्न झालेल्या देवी-देवतासुद्धा 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोके विशन्ति' -पुण्य क्षीण होताच मृत्युलोकी जातात, पराधीन आहेत, त्यांची पूजा करणे अविधिपूर्वक आहे. तेव्हा केवळ एका परमात्म्यावर श्रद्धा ठेवावी. वेदांमध्ये ऋषिंनी म्हटले आहे -

**हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत्।**
**स दाधार पृथिवीं द्यामुते मां कस्मै देवाय हविषा विधेम्।।**

*(ऋग्वेद, १/१२१/१)*

अर्थात् सोन्यासारखा चमकणारा परमात्मा सर्वांत आधी उत्पन्न झाला. जन्म घेणाऱ्या सर्व प्राणीमात्रांचा तो एकमात्र पति आहे. त्यानेच पृथ्वी व आकाशाला धारण केले. त्याच्या व्यतिरिक्त कोणत्या देवाची आहुतिद्वारे पूजा करावी?

ह्यावरून स्पष्ट आहे की एकमेव परमात्म्याला प्राप्त करणे हेच तुमचे-आमचे कर्तव्य-कर्म आहे. ह्याच निर्धारित कर्माचे क्रमवार वर्णन भगवद्गीतेमध्ये केलेले आहे. त्यामध्ये दैवी संपत्ति नामक सद्गुणांचा विकास करणे, एकांतवासात राहणे, श्वास-प्रश्वासाद्वारे ओम् अथवा भगवंताच्या कोणत्याही दोन-अडीच अक्षरी नामाचा जप करणे, इंद्रियांचे दमन व मनाचा निरोध करणे, धारावाहिक चिंतन करणे, युक्ताहार-विहार करणे व तत्त्वदर्शी महापुरुषांना शरण जाणे हे सर्व येते. ह्याच क्रियेद्वारे हृदयस्थ परमात्म्याला जाणण्या व्यतिरिक्त मृत्युला जिंकण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही.

पूर्वजांनी तपश्चर्या करून शाश्वत सत्य प्राप्त केले, तो परमपुरुष म्हणजे हृदयस्थित परमात्मा होय. घरो-घरी प्रत्येक कुटुंबाकडे जाऊन त्यांनी शाश्वत सत्याला दृढ केले व आजही जे तसे करतात ते श्रद्धेस पात्र आहेत. त्यांना दक्षिणा देणे म्हणजे किंमत चुकविणे नसून, कृतज्ञता व्यक्त करणे आहे. दक्षिणा देण्याने शाश्वत सत्याची जाणीव लोकांना करून देण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळेल व शाश्वत सत्य कायम राहिल. गीतेमध्ये म्हटले आहे-

**यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।।** *(गीता १८/४६)*

ज्या परमात्म्यापासून सर्व भूतमात्रांची उत्पत्ति झाली, ज्याने सर्व जग व्यापलेले आहे त्या परमेश्वराची स्वभावातून उत्पन्न झालेल्या कर्म करण्याच्या

क्षमतेनुसार पूजा-अर्चा करून मनुष्य परमसिद्धि प्राप्त करतो. आपण शुद्र स्थितीमध्ये आहात, वैश्य स्थितीमध्ये आहात, क्षत्रिय स्थितीमध्ये अथवा ब्राह्मण स्थितीमध्ये आहात, सर्वांना त्या परमात्म्याचीच आराधना करावयाची आहे.

भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले की आपल्या दोघांमधील हा संवाद जो माझ्या भक्तांना सांगेल, त्याच्याद्वारे मी पुजला जाईन. म्हणजे जो सांगतो त्याच्या हातून पूजा घडली, परंतु ज्यांनी अजून कोणतीही पातळी गाठली नाही, जे साधनेमध्ये अबोध आहेत, त्यांना शास्त्रोक्त पूजेचा विधि सांगावयाचा आहे. ह्या पूजन पद्धतीचा बोध करणे म्हणजे कर्मकांड होय.

जेव्हापासून शास्त्रांची रचना केली गेली तेव्हापासून 'गीता' हेच धर्मशास्त्र मानले गेलेले आहे, **'गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्र विस्तरैः'** - गीतेचा चांगाल्याप्रकारे अभ्यास करून, मनन करून ही हृदयामध्ये धारण करण्यायोग्य आहे, तेव्हा अन्य शास्त्रांचा अभ्यास करण्याची काय आवश्यकता? कारण गीता स्वतः भगवान पद्मनाभांच्या श्रीमुखातून निःसृत झालेली वाणी आहे. म्हणून गीता मानवमात्राचे धर्मशास्त्र आहे.

गीतेमध्येच पुरुषोत्तम श्रीकृष्णाने स्वतः म्हटले आहे - **'इति गुह्यतमं शास्त्रम्'** हे अर्जुना! हे गोपनीय शास्त्र आहे. शास्त्र जाणून मनुष्य ह्या लोकी परम समृद्धि व परमश्रेय प्राप्त करतो, परंतु हा गीतोक्त विधि सोडून अन्य विधींनी पूजन केल्याने ना सिद्धि प्राप्त होते, ना सुख व ना परमगति. म्हणून तुमच्या कर्तव्य व अकर्तव्याच्या बाबतीत गीता हेच प्रमाण आहे.

**ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते।**
**श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः।।** *(गीता १२/२०)*

जे मत्परायण झालेले श्रद्धायुक्त पुरुष गीतोक्त धर्ममय अमृताचे चांगल्या प्रकारे सेवन करतात, ते सर्व भक्त मला अतिशय प्रिय असतात. अन्य काहीही करणे म्हणजे ह्या समाजाला भ्रमामध्ये टाकणे आहे. तेव्हा षोडश संस्कारांच्या वेळी तसेच षोडशोपचार पूजेच्यावेळी गीतेमधील मंत्रच म्हटले पाहिजेत.

*- संकलनकर्ता*

ॐ श्री परमात्मने नमः

## परमात्म्यावर श्रद्धा......

पुरोहिताने कर्मकांडाच्या आरंभीच यजमानाची श्रद्धा एका परमात्म्यावर स्थिर केली पाहिजे.

गीतेच्या आरंभी अर्जुनाने म्हटले, 'गोविंद! कुल-धर्म सनातन आहे, जाति-धर्म शाश्वत आहे. युद्ध केल्याने सनातन धर्म नष्ट होईल' अर्जुन प्रश्न-प्रतिप्रश्न करू लागला. परंतु दहाव्या अध्यायात जेव्हा भगवंतांनी आपल्या विभूतींचे विस्तृत वर्णन केले, 'सूर्यामधील तेज मी आहे, चंद्रामधील शीतलता मी आहे, पृथ्वीमधील क्षमता मी आहे, तेजस्वींचे तेज मी आहे म्हणून तू मला शरण ये' तेव्हा अर्जुन म्हणाला 'गोविंद! आपण जे सांगत आहात ते सत्य आहे परंतु मला ते प्रत्यक्ष पहावयाचे आहे' भगवंत म्हणाले, "अर्जुना! तू माझा प्रिय भक्त आहेस, अनन्य सखा आहेस. असे काहीही नाही जे मी तुला देऊ शकणार नाही. बघ, सर्वत्र पसरलेले माझे तेज बघ, जगाला एका ठिकाणी स्तब्ध झालेले बघ." 'भगवंत दाखवित गेले परंतु अर्जुनाला काहीही दिसले नाही. भगवंतांनी थांबून अर्जुनाला दिव्यदृष्टि प्रदान केली. नंतर अर्जुनाने पाहिले व त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले, धनुष्य हातातून निसटले, त्याचे अंग तापले. तो स्तुति करू लागला-

**त्वमक्षरं परमं वेदितव्यं**
**त्वमस्य विश्वस्य परं निधानम्।**
**त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता**
**सनातनस्त्वं पुरुषो मतो मे।।** *(गीता ११/१८)*

'भगवंत! आपण गूढ असलेल्या धर्माचे रक्षक आहात, एकमात्र आपणच जाणण्या योग्य देव आहात, आपण सनातन पुरुष आहात.' आरंभी हाच अर्जुन म्हणत होता की कुल-धर्म सनातन आहे. त्याच अर्जुनाने जेव्हा प्रत्यक्ष पाहिले तेव्हा म्हणू लागला, 'आपण सनातन आहात. देवतांचा समूह आपल्यामध्येच प्रवेश करीत आहे. वसू, रुद्र, आदित्य, वायु व अग्नि इत्यादि विस्मयाने द्विधा मनस्थितीमध्ये उभे राहून आपले ऐश्वर्य पहात आहेत. तेव्हा भगवंत!

**पितासि लोकस्य चराचरस्य**
**त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान्।**
**न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो**
**लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव ।।** *(गीता११/४३)*

आपण गुरुंचेही आदिगुरु आहात, पूजनीय आहात, अतिपवित्र आहात. तिनही लोकांमध्ये अद्वितीय प्रभाव असणाऱ्या आपल्या समान दुसरा कोणी नाही, तेव्हा तुमच्या वरचढ कोण असणार?

तेव्हा, भगवंत प्रत्यक्ष दर्शन आहेत. ज्या महापुरुषांनी भगवत्–स्वरूपास प्राप्त केले होते त्यांचे प्रतिनिधी 'पुरोहित' आहेत. हे पुरोहित महापुरुषाच्या उपदेशाचा पुनरुच्चार करून लोकांवर संस्कार करतात, भाव निर्माण करतात. एका परमेश्वराची आराधना करण्याचे जेव्हा बीज रूजते, तेव्हा सद्‌गुरु प्राप्त होतात. सद्‌गुरु प्राप्त होताच भगवंतापर्यंत पोहचण्याचा मार्ग सुकर होतो व तुम्ही त्यास प्राप्त करून घेता. पूजन एका परमात्म्याचेच केले पाहिजे. त्या अविनाशी परमात्म्याला प्राप्त करण्यासाठी –

**तुम ते अधिक गुरहिं जिय जानी। सकल भाय सेवहिं सनमानी।।**

भगवान श्रीकृष्ण म्हणतात, त्या अमृतमय परमज्ञानाला जाणण्यासाठी एखाद्या तत्त्वदर्शीला शरण जा. भगवान बुद्ध म्हणाले, 'तथागत' – 'ज्याला ते तत्त्व अवगत असेल, त्याला शरण जा' पाली भाषेतील 'तथागत' व भगवान श्रीकृष्णांचे 'तत्त्वदर्शी' हे पर्यायवाची शब्द आहेत. त्याचप्रमाणे भगवान महावीर म्हणाले – हृदयस्थित, आत्मस्वरूप, ज्योतिर्मय परमात्म्याला प्राप्त करावयाचे असेल तर ज्यांच्या हृदयाचे शत्रु शांत झालेले आहेत अशा 'अरिहंता' ला नमन करा. 'नमो सिद्धाणम्' – अशा सिद्ध पुरुषाला शरण जा ज्याने ते परमतत्त्व जाणले आहे, संपादन केले आहे. 'उवज्झायाणां' अर्थात् खरा उपदेश करणाऱ्या पुरोहितांना, आचार्यांना शरण जा. 'लोये सर्व साहूणां' – ह्या लोकीच्या समस्त संतांना शरण जा. मंगल होण्याचा हाच एक उपाय आहे आणि हेच आपल्या कर्मकांडाचे उद्दिष्ट आहे की महापुरुषांचा उपदेश लोकांपर्यंत पोहोचवून एका ब्रह्मामध्ये श्रद्धा स्थिर करणे.

भगवान श्रीकृष्ण म्हणतात –

**तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः।**
**प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम्।।** *(गीता १७/२४)*

अर्जुना! यज्ञ, दान, तप, संयम – समस्त मंगल क्रियांमध्ये आरंभापासून पूर्तिपर्यंत 'ओम' उच्चारणानेच क्रिया आरंभ होतात ज्यामुळे परमात्म्याचे चांगल्या प्रकारे चिंतन होते. 'ॐ' परमात्म्याचे नाम आहे. भगवंत म्हणतात, 'अक्षरांमध्ये ओंकार मी आहे. ॐचा जप करा आणि माझ्या स्वरूपाचे ध्यान धरा.' तेव्हा

स्त्री–पुरुष सर्वांनी ओंकाराचे स्मरण केले पाहिजे. पुरोहित व यजमानांनी एका परमेश्वराचे स्वरूप हृदयात धारण करावे व तोच सर्वशक्तिमान, दैदिप्यमान, कणा–कणामध्ये व्यापलेला आहे ह्या भावनेने त्याच्याठायी श्रद्धा स्थिर ठेऊन त्याच्या नावाचा जप करावा.

**त्वमेव माताश्चपिता त्वमेव**
**त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव।**
**त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव**
**त्वमेव सर्वं मम देव देव।।**

परमात्माच सर्वस्व आहे असे प्रभूचा महिमा सांगणारे श्लोक म्हणावेत. प्रवचन ऐकत असताना परमेश्वराच्या नावाचा जप तर अनिवार्य आहेच परंतु शेष जीवानामध्येही तो निरंतर चालू राहिला पाहिजे. आयुष्यभर करावा असा हा अभ्यास आहे.

ह्या संदर्भात मध्यकाळापासुन एक भ्रांति पसरलेली आहे की 'ओम' चा जप गृहस्थाश्रमी करू शकत नाही. हा जप केवळ विरक्त पुरुष करू शकतात. ही चुकीची समजूत आहे. अर्जुन पूर्णपणे गृहस्थाश्रमी होता, परंतु भगवंतानी त्यास 'ओम' चा जप व त्यांचे ध्यान करायला सांगितले. स्त्रिया ओम्‌चा जप करू शकत नाहीत. ही सुद्धा भ्रांति आहे. अध्यात्म दर्शनशास्त्र असलेल्या गीतेमध्ये स्त्री–पुरुष हा भेद केलेला नाही–

**द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च।**
**क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते।।** *(गीता १५/१६)*

भगवंत म्हणतात, 'अर्जुना! पुरुष दोन प्रकारचा असतो – क्षर आणि अक्षर – प्राणिमात्रांचे शरीर म्हणजे क्षर पुरुष होय. संस्कार असतात तोपर्यंत शरीर प्राप्त होत रहाते व तोपर्यंत प्रत्येक प्राणी क्षर पुरुष असतो. '**कूटस्थोऽक्षर उच्चते**' – मनासहित इंद्रिये जेव्हा स्थिर होतात तेव्हा तोच प्राणी अक्षर पुरुष होतो. शरीर केवळ वस्त्र आहे मग तो पुरुष असो अथवा स्त्री! तेव्हा आबाल–वृद्ध सर्वांनी एकत्र बसून श्रवण केले पाहिजे. '**लोक लाहु परलोक निबाहू**' – ह्या लोकी समृद्ध जीवन व परमश्रेय प्राप्त करण्याचे ते साधन आहे. का व कसे आहे? हे जाणण्यासाठी भगवान श्रीकृष्णाच्या मुखातून निघालेल्या गीतेचे वाचन करा. ध्यान कसे करावे? आराधना कशी करावी? ह्यासाठी गीताभाष्य 'यथार्थ गीता' अवश्य वाचा.

# ॥न्यास॥

'अस्' धातूला 'निः' उपसर्ग लाऊन उत्पन्न होणाऱ्या 'न्यास' ह्या शब्दाचे बरेच अर्थ आहेत – स्थापित करणे, समर्पण करणे, त्यागणे, अमानत ठेवणे, चिन्ह बनविणे, चित्रित करणे इत्यादि.

न्यास, मुद्रा, यंत्र, चक्र, मंडल ही तांत्रिक पूजेची महत्वाची अंगे आहेत. ह्या क्रियांचा उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्ये आढळत नाही, परंतु नंतरच्या काळातील साहित्यामध्ये त्यांचे वर्णन मोठ्या प्रमाणात आढळते. ह्यावरून स्पष्ट होते की ह्या क्रिया बौद्ध धर्माच्या महायान शाखेपासून, विशेषतः वज्रयानापासून उत्पन्न झालेल्या पंचमकाराच्या साधनेवर आधारित असून तंत्र ग्रंथांनी प्रभावित झालेल्या पुराणांद्वारे इस्वीसन सहा अथवा सातच्या नंतर प्रचलनात आल्या आहेत.

गरुड पुराण, नारदीय पुराण, अग्नि पुराण, भागवत पुराण, ब्रह्म पुराण, पद्म पुराण, मत्स्य पुराण, कालिका पुराण तसेच देवीभागवत इत्यादि पुराणांमध्ये ओम् नमो नारायण, ओम् नमो भगवते वासुदेवाय ह्या मंत्राबरोबरच अनेक प्रकारच्या न्यासांचे वर्णन आहे, जसे – हंस न्यास, प्रणवन्यास, मातृकान्यास, करन्यास, अंगन्यास, पीठन्यास इत्यादि.

हंस न्यास मध्ये **'हं पुरुषात्मने नमः', 'सः प्रकृत्यात्मने नमः', 'हंस प्रकृति पुरुषात्मने नमः'** – असे म्हटले जाते. मातृका न्यास मध्ये 'अ' पासून 'क्ष' पर्यंतच्या पन्नास अक्षरांचा न्यास शरीरामधील सूक्ष्म षट्चक्रांच्या कमलदलांच्या संख्येनुसार केला जातो.

'प्रपंचसार' आणि 'सौन्दर्यलहरी' ग्रन्थांमध्ये (ज्या ग्रंथांना महान अद्वैतवादी आचार्य शंकर रचित म्हटले जाते, वास्तविक त्यांची रचना अन्य गौडदेशीय शंकर ह्यांनी केली आहे.) तसेच अन्य तंत्र ग्रंथांमध्ये न्यास क्रियेचा विधी पुढील प्रमाणे सांगितला आहे – **हृदय शिरसोः शिखायां कवचाक्ष्यस्त्रेषु सह चतुर्थीषु। नत्या, हुत्या च वषट् हुं वौषट् फटपदैः षडङ्ग विधि।।** अर्थात् – हृदय, शिर, शिखा, कवच, अक्षि आणि अस्त्र ह्या शब्दांना चतुर्थी विभक्ति प्रत्यय लावून त्यापुढे क्रमशः नमः, स्वाहा, वषट्, हुं, वौषट् आणि फट् ह्या शब्दांच्या प्रयोगाने जो होतो तो अंगन्यास होय. उदाहरणार्थ **ॐ हृदयाय नमः, ॐ शिरसे स्वाहा, ॐ शिखायै वषट्, ॐ कवचाय हु, ॐ नेत्रत्रयाय अथवा नेत्रद्वयाय वौषट्, ॐ अस्त्राय फट्** – अशाप्रकारे अंगन्यासामध्ये प्रणवन्यास आहे. त्याच प्रमाणे ह्या अनुष्ठानांमध्ये बीज, शक्ति, कीलक, अर्गला इत्यादिंची परिकल्पना सुद्धा बलसंबंधीत शास्त्रांची देणगी आहे.

आदि धर्मशास्त्र गीतेमध्ये समस्त प्रापंचिक सुखे तसेच लौकिक - पारलौकिक शाश्वत शांति ह्यांच्या प्राप्तिसाठी एकच निर्धारीत सरळ विधि सांगितला आहे ज्यामध्ये एका परमात्म्याठायी समर्पण, ॐ चा जप, सद्‌गुरुंना समर्पण तसेच इंद्रियांचा संयम अशा क्रिया मानवमात्रासाठी सांगितलेल्या आहेत. मानवमात्राला सावधानही केलेले आहे की **'बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम्।'** *(२/४१)*. अर्जुना! अविवेकी लोकांच्या बुद्धिला अनंत फाटे फुटलेले असतात म्हणून ते पूजन-पद्धतिच्या नावावर अनंत क्रिया करीत असतात व रसाळ शोभायुक्त वाणीने त्यांचे वर्णनही करीत असतात. त्यांच्या वाणीचा प्रभाव ज्यांच्यावर पडतो ते ही नष्ट होतात.

तेव्हा यज्ञवेदी कशी तयार करावी? जपाची संख्या किती असावी? जपमाळ कोणत्या बोटांनी धरावी, त्यात किती मणी असावेत? परिमाणांसहित देव-देवतांचे किती मंडल काढावेत व ते कोणत्या रंगाचे असावेत? अशा अतिशय बारीक-सारीक बाह्य व्यवेस्थेकडे लक्ष दिल्याने परमात्म्याचे चिंतन करणे बाजूला रहाते, श्रद्धा विखुरली जाते, व्यवस्थेचेच महत्व वाढते.

असो, तेव्हा विद्वान पुरोहितांनी ह्या क्रियांचा अनावश्यक विस्तार न करता एका परमात्म्यावर श्रद्धा ठेवण्याकडे लोकांना केंद्रित केले पाहिजे, धर्मशास्त्र गीता पठणाला प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यातील संस्कृत श्लोकांबरोबरच त्या श्लोकांचा यथार्थ आशय प्रादेशिक भाषेमध्ये लोकांना समजावून सांगितला पाहिजे, अन्यथा जे शेंडी ठेवीत नाहीत, जे हाता-पायाने विकलांग आहेत त्यांच्यासाठी अंगुष्ठादि करन्यास, हृदयादि अंगन्यास ह्यांचा काय उपयोग? ऐं, हीं, क्लीं, हुं, फट् ह्या बीज मंत्रांच्या प्रयोगाने होणाऱ्या रोगशांति, वशीकरण, स्तंभन, विद्वेषण, उच्चाटन तथा मारण अशा अभिचार क्रियांमुळे अनैतिक मार्गाकडे कल होण्याची परंपरा वाढिस लागेल. ह्या लोकी वरील असन्मानित तंत्रांना आधार देण्यासाठी काही उपनिषदे रचली गेली होती. महाभारताच्या विराट पर्वामध्ये व भिष्म पर्वामध्ये ती प्रक्षेपितही केली गेली, परंतु संयम प्रधान भारतीय संस्कृतीने ह्या भोगवादी क्रियांना कधीही आत्मसात केले नाही.

'गीता' हेच आपले धर्मशास्त्र आहे. ते मानवाचे आदि धर्मशास्त्र आहे. मानवाच्या उत्पत्तीबरोबरच त्याची उत्पत्ती झाली. स्वयं श्री भगवान पदम्नाभांच्या श्रीमुखातून ते प्रसारित झाले. तेव्हा मनुष्य निर्मळ होता व अपौरुषेयवाणी श्रीमद्‌भगवद्‌गीता त्याच्याबरोबर अवतरली म्हणूनच - **'गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्र विस्तरैः। या स्वयं पद्मनाभस्य मुख पद्माद्विनिःसृत्ता।।**

गीतेच्या चौथ्या अध्यायातील पहिल्या श्लोकामध्ये आहे की भगवंतांनी हा अविनाशी योग कल्पाच्या आरंभी सूर्याला सांगितला, सूर्याने त्याचा पूत्र आदि मनु ह्यास सांगितला. मनुने आपल्या स्मृतिमध्ये तो धारण केला. पूर्वजांची बुद्धि इतकी विशाल होती की त्यांनी ते संपूर्ण शास्त्र स्मृति पटलावर धारण केले. हीच आदि मनुस्मृति होय.

गीतेनुसार एक आत्माच सत्य आहे, विधाता आणि त्याच्यापासून उत्पन झालेली सृष्टि नश्वर आहे, शरीर नाशिवंत आहे. गीतेमध्ये (१८/४०) म्हटले आहे की पृथ्वीवर, स्वर्गांत अथवा देवतांमध्ये असा कोणीही प्राणी नाही जो प्रकृतिपासून उत्पन्न झालेल्या तीनही गुणांरहित आहे, अर्थात् देवतासुद्धा तीनही गुणांच्या कक्षेत येतात. संपूर्ण जग क्षणभंगुर आहे, जन्म-मृत्यूच्या चक्रात अडकलेले आहे, तीनही गुणांनी बांधलेले आहे, नश्वर आहे. अशा परिस्थितीत आपण अभय पदाला, नित्य तत्त्वाला, सनातन पुरुषाला कसे प्राप्त करावे? त्या निर्धारित विधिचे नाव 'यज्ञ' होय.

वस्तुतः योगविधि म्हणजे यज्ञ ज्यामध्ये बरेच योगी श्वासामध्ये प्रश्वासाचे हवन करतात, बरेच जण प्रश्वासाचे श्वासामध्ये हवन करतात - गीतेमध्ये चौदा प्रकारचे यज्ञ सांगितले गेले आहेत.

ह्या योगविधि यज्ञाला आचरणात आणणे म्हणजे 'कर्म'. कर्म म्हणजे आराधना. '**किं कर्म यत्प्रीति करं मुरारे**', '**यज्ञार्थात्कर्मणो**' *(३/९)*. सृष्टिमध्ये कर्म कोणते? परमात्म्याच्या चरण कमलांवर श्रद्धा, प्रीति ठेवणे. प्रीति कोणावर करावी? कशी करावी? हा बोध करून देण्यासाठी कर्मकांडाची रचना केली गेली. महापुरुषांनी जीवनातील सुख-दुःखाच्या घटनांमधून काही घटना निवडल्या. ह्या घटनांच्यावेळी समाज संघटित झालेला असतो व एकाग्रचित्त असतो. कर्तव्य-अकर्तव्याबद्दलचा निर्णय जाणण्यास उत्सुक असतो. महापुरुषांनी अशा घटनांचे औचित्य साधून पुरोहितांच्या माध्यमातून समाजावर परमात्म्यावरील श्रद्धेचे बीजारोपण केले.

कुटुंबामध्ये गर्भाधान, जन्म, बारसे, जावळ काढणे, उष्टावण, उपनयन, विवाह, घर बांधताना भूमिपूजन, गृहप्रवेश, मृत्युनंतर अंतिम क्रियाकर्म, वर्षश्राद्ध इत्यादि धटना घडत रहातात. अशा प्रत्येक घटनेच्यावेळी जे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी दुर्लभ मानव शरीर प्राप्त झालेले आहे त्या कर्तव्याची जाणीव करून देणे म्हणजे कर्मकांड होय. त्यामुळे मनुष्य ह्याच शरीराने आत्मसाक्षात्काराचे ध्येय पूर्ण करण्याच्या मार्गावर पुढे जाईल. '**तमेव शरणं गच्छ सर्व भावेन भारत। तत्प्रसादात्परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्।।**' *(१८/६२)*. त्याच्या कृपाप्रसादाने मनुष्याला परम-शांति, अनंत जीवन व मोक्ष प्राप्त होईल.

परमेश्वराशी युक्त नसलेल्या आपल्या चंचल मनाला एकाग्र करण्यासाठी षोडशोपचार पूजेव्यतिरिक्त परंपरागत करन्यास तसेच हृदयादि अंगन्यास ह्यांचाही थोडासा उपयोग आहे. परंतु त्यांचा आशय केवळ इतकाच आहे की आपल्या हृदयामध्ये तसेच मनामध्ये आणि बुद्धिमध्ये एका परमात्म्याला स्थापित करणे, आपल्या हातांना व इतर इंद्रियांना परमेश्वर प्राप्तीच्या मार्गावर नेणे. जीवनामध्ये आपले डोळे ना इतर काही पहातील, ना कान इतर काही ऐकतील, ना मन दुसरा कोणताही संकल्प करेल व ना बुद्धि दुसरा कोणताही निर्णय घेईल म्हणून सुरुवातीपासूनच मानवाने त्याचा दृष्टिकोन व त्याची श्रद्धा एका परमात्म्यामध्ये स्थिर करावी, मन आणि इंद्रिये त्या परमेश्वराला अर्पित करावीत. जन्मलेला प्रत्येक व्यक्ति परमश्रेयाचा पथिक आहे. समर्पणामुळे तो जीवनात भरकट जात नाही कारण सुरुवातीपासूनच त्याला त्याच्या ध्येयाची जाणीव असते व त्याची दृष्टि ध्येयावर स्थिर असते.

तेव्हा प्रत्येक कर्मकांडाच्या प्रसंगी संपूर्ण गीता अथवा त्यातील थोडा भाग पठण करण्यापूर्वी त्याचा परिचय करन्यासाच्या माध्यमातून दिला जातो.

**१ ) ॐ अस्य श्रीमद्भगवत्गीता माला मंत्रस्य भगवान् वेदव्यास ऋषिः।**

प्रथम सर्व श्रुतज्ञान होते. लोक ऐकत असत आणि आपल्या बुद्धिमध्ये स्मरण करून ठेवत असत म्हणून शास्त्राला 'स्मृति' असेही म्हणायचे. वेदव्यासांनी ह्या परंपरेमध्ये सुधारणा करून ते ज्ञान लिपिबद्ध केले. त्या सर्वांमध्ये गीतेलाच त्यांनी शास्त्र म्हणून सन्मानित केले.'गीता' ही मंत्राची माळ आहे.

त्यामध्ये एकही अनावश्यक सूत्र नाही. महर्षिंनी त्याची रचना अतिशय क्रमबद्ध केली आहे. ती संस्कृतच्या अनुष्टुप छंदामध्ये असून प्रत्येक आठ अक्षरांनंतर अर्धविराम व नंतरच्या आठ वर्णांनंतर पूर्ण विराम असा क्रम आहे.

**२ ) श्रीकृष्णः परमात्म देवताः।**

भगवान श्रीकृष्ण परमदेव परमात्मा आहेत. एक परमात्माच सत्य आहे. तेच देव आहेत.

न्यासाचा आरंभ बीजारोपणाने होतो. मानवाच्या मनामध्ये कोणत्या संस्काराचे बीज पेरावे? कसे पेरावे?

**३ ) नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।**
**उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः।।** *(२/१६)*

**– इति बीजम्।**

अर्जुना! असत्याला अस्तित्व नसते, त्यास कोणी थांबवू शकत नाही आणि तीनही काळामध्ये सत्याला अभाव नसतो. ते अपरिवर्तनशील असते, अबद्ध असते. ते सत्य म्हणजेच सनातन शाश्वत पुरुष आत्मा होय. तेच आपले मूळ बीज आहे.

भगवान श्रीकृष्ण म्हणतात –

**४ ) 'सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।'** *(१८/६६)*

**– इति शक्तिः।**

सर्व धर्मांचा त्याग करून केवळ मला शरण ये. हीच ह्या जीवाची शक्ति आहे.

**५ ) 'अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।'**

**– इति कीलकम्।**

भगवंत म्हणतात की अशा समर्पित झालेल्या भक्ताची जबाबदारी ते स्वतः घेतात. 'अर्जुना! तू शोक करू नकोस. मला शरण ये, मी तुला सर्व पापांपासून मुक्त करेन'.अशाप्रकारे भगवंतांनी सर्व पापांना बांधून (कील) टाकले.

**६ ) 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावक।'** *(२/२३)*

**ॐ अंगुष्ठाभ्यां नमः।**

ज्यास शस्त्र कापू शकत नाही, अग्नि जाळू शकत नाही, ॐ हे ज्याचे वाचिक नाम आहे त्या परमात्म्याला मी माझ्या अंगठ्यावर आवाहन करतो, त्यास नमन करतो.

**७ ) 'न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः।'** *(२/२३)*

**ॐ तर्जनीभ्यां नमः।**

त्यास ना पाणी ओले करू शकते, ना वारा सुकवू शकतो. अशा ॐ कार स्वरूप परमात्म्याला मी माझ्या तर्जनीवर स्थापित करतो, त्यास नमन करतो.

**८ ) 'अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च।'** *(२/२४)*

**ॐमध्यमाभ्यां नमः।**

ज्यास शस्त्र कापू शकत नाही, अग्नि जाळू शकत नाही, पाणी ओले करू शकत नाही, वारा सुकवू शकत नाही, अशा आत्म्याला शरण जावे. ॐ स्वरूप परमात्म्याला मध्यावर (मधल्या बोटावर) विराजमान करावे, त्यास नमन करावे.

**९ ) 'नित्यः सवर्गतः स्थाणुरचलोऽयं सनातनः।'** *(२/२४)*

**ॐ अनामिकाभ्यां नमः।**

हा आत्मा नित्य, सर्वव्यापी, अचल, स्थिर रहाणारा आहे व तोच सनातन आहे. ह्या सनातन ॐ स्वरूप परमात्म्याला आपल्या अनामिकेवर आवाहन करावे, त्यास नमन करावे.

**१० ) 'अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते।**
**तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि।।'***(२/२५)*
**ॐ कनिष्ठिकाभ्यां नमः।**

हा आत्मा अव्यक्त आहे, अचिन्त्य आहे, अविकारी आहे. अशा त्या प्रभूच्याठायी चित्ताचा निरोध करावा. अशाप्रकारे ॐ स्वरूप परमात्म्याला आपल्या कनिष्ठिकेवर (करंगळीवर) स्थापित करावे, त्यास नमन करावे.

**११ ) 'पश्य मे पार्थ रूपाणि शतशः अथ सहस्त्रशः।**
**नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च।।'***(११/५)*
**ॐ करतल करपृष्टाभ्यां नमः।**

पार्था! माझ्या शेकडो अथवा हजारो प्रकारच्या आणि अनेक वर्ण तसेच आकृति असणाऱ्या दिव्य स्वरूपाला पहा! तळहातावरील व हाताच्या पृष्ठभागावरील ॐ स्वरूप परमात्म्याला नमन करावे.

## ।।अथ हृदयादि न्यास।।

अविनाशी अशा परमात्म्याच्या चरणांना हृदयामध्ये धारण करणे म्हणजे हृदयन्यास होय.

**१. 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहती पावकः।'**
**ॐ इति हृदयाय नमः।**

ज्यास शस्त्र कापू शकत नाही, अग्नि जाळू शकत नाही अशा सर्वव्याप्त असलेल्या प्रभूला हृदयामध्ये आवाहन करावे, त्यास नमन करावे.

**२. 'न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः।'**
**ॐ इति शिरसे स्वाहा।**

ज्यास पाणी ओले करू शकत नाही व वायु सुकवू शकत नाही अशा अपरिवर्तनशील, अविनाशी आत्म्याला डोके टेकून नमन करावे.

**३. 'अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च।'**
**ॐ इति शिखायै वषट्।**

ज्यास शस्त्र कापू शकत नाही, अग्नि जाळू शकत नाही, पाणी ओले करू शकत नाही अशा परमात्म्याच्या प्राप्तीचे ध्येय ठेऊन त्यास मस्तकामध्ये आवाहन करावे, ॐ स्वरूप परमात्म्याला नमन करावे.

**४. 'नित्य सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः।'**

**ॐ इति कवचाय हुं।**

हा आत्मा नित्य आहे, सर्वव्यापी आहे, अचल आणि सनातन आहे. तोच आपला रक्षक आहे, कवच आहे. त्या परमात्म्याला आपल्या शरीरावर आच्छादित करावे. त्यास नमन करावे।

**५. 'पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्त्रशः। '**

**ॐ इति नेत्रत्रयाय वौषट्।**

'अर्जुना! माझ्या अनंत प्रकारच्या स्वरूपांना बघ!' सर्वत्र इष्ट विद्यमान असते हा अनुभव घ्यावा. डोळ्यांना स्पर्श करून ॐ स्वरूप परमात्म्याला नमन करावे. ज्ञानरूपी तृतीय नेत्राची जागृति व्हावी ह्यासाठी साधना करावी. श्रद्धा व समर्पणाने ध्येयावर दृष्टि ठेवून साधना केल्यानेच ज्ञानरूपी तृतीय नेत्र उघडतो.

**६. तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व**
**जित्वा शत्रून्भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम्।**
**मयैवैते निहताः पूर्वमेव**
**निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्।।** *(११/३३)*

**ॐ इति अस्त्राय फट्।**

"म्हणून अर्जुना! तू युद्धासाठी तयार हो. हे शूरवीर माझ्याद्वारे आधीच मारले गेलेले आहेत. सव्यसाची! तू केवळ निमित्त मात्र हो. केवळ उभा रहा. विजय तुझाच होईल." भगवंतांचे हे आश्वासन अस्त्राप्रमाणे विकारांचा संहार करू दे. अस्त्राप्रमाणे असलेल्या ह्या ॐ स्वरूप परमात्म्याला नमन करावे.

तात्पर्य – 'न्यास' म्हणजे एका परमात्म्याठायी समर्पण. म्हणून –

**७. श्रीकृष्ण प्रीत्यर्थे पाठे वा पूजने विनियोगः।**

एका परमात्म्याच्या अर्थात् श्रीकृष्णांच्या चरणी अतूट श्रद्धेसाठीच पूजन पद्धतीमध्ये न्यासाचा समावेश करण्याचे विधान आहे.

**।।ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।।**

# मंगलपाठ (पुण्याहवाचन)

(आपल्या अस्तित्वासाठी मंगलपाठ)

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुधरः।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम।।** *(गीता १८/७८)*

राजन्! जेथे योगेश्वर श्रीकृष्ण आणि ध्यानाला धारण करणारा महात्मा अर्जुन म्हणजेच अनुरागी साधक आहे, तेथेच विजय, विभूति, श्रीः आणि अचल नीति आहे. हेच सर्वांगीण मंगल होय.

**श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः।**
**ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्चति।।** *(गीता ४/३९)*

श्रद्धाळू, तत्पर तसेच संयतेन्द्रिय पुरुषच ज्ञान प्राप्त करू शकतो. ज्ञान प्राप्त करून तो तत्क्षणी परमशांति प्राप्त करतो. त्यानंतर काहीही प्राप्त करणे शिल्लक रहात नाही. हीच शाश्वत शांती होय, हेच परम मंगल होय.

।।ॐ श्री परमात्मने नमः।।

# ।।अथ षोडशोपचार पूजन पद्धति।।

*सूचनाः आपली इच्छा असल्यास आपण गीतेबरोबर पुरुष-सूक्तामधील ऋचाही म्हणू शकता. दोन्हींचा संदेश एकच आहे, तो म्हणजे परमात्म्या प्रति समर्पण.*

**ध्यानम् -**

**त्वमक्षरं परमं वेदितव्यं**
**त्वमस्य विश्वस्य परं निधानम्।**
**त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता**
**सनातनस्त्वं पुरुषो मतो मे।।** *(गीता ११-१८)*

**ध्यानम् समर्पयामि।**

भगवान्! आपण जाणून घेण्यास योग्य परम अक्षर अर्थात् परमात्मा आहात. आपण ह्या जगताचे परम आश्रय आहात. आपण शाश्वत धर्माचे रक्षक आहात, तसेच आपण अविनाशी पुरुष आहात असे माझे मत आहे. तेव्हा त्यांच्या व्यतिरिक्त कोणत्या देवाची हवि द्वारे पूजा करावी?

**१. आवाहनम् -**

**सर्वतःपाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम्।**
**सर्वतःश्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति।।** *(गीता १३-१३)*

**आवहनं समर्पयामि।**

ते ब्रह्म सर्व बाजूंनी हात-पाय असलेले आहे, सर्व बाजूंनी डोळे, डोके व तोंड असलेले, तसेच सर्व बाजूंनी कान असलेले आहे, कारण ते सृष्टिमध्ये सर्वांना व्यापून राहीलेले आहे.

❖ ❖ ❖

**ॐ सहस्त्रशीर्षा पुरुषः सहस्त्राक्षः सहस्त्रपात्।**
**स भूमि ँ सर्वत स्पृत्वाऽत्यतिष्ठद्दशाङ्गुलम्।। १।।**

**२. आसनम् -**

**शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः।**
**नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम्।।** *(गीता ६-११)*

**आसनम् समर्पयामि।**

पवित्र भूमीवर गवत, मृगासन अथवा आसन पसरावे. आसन फार उंच अथवा अगदी जमीनीलगत नसावे व ते स्थिर असावे.

❖ ❖ ❖

**ॐ पुरुष एवेद ँ् सर्वं यद्भूतं यच्च भाव्यम्।**
**उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति।।२।।**

भूत, भविष्य आणि वर्तमान – हे सर्व तो परमपुरुषच आहे. अमरत्वाचा स्वामी आहे. ईश्वरीय चिंतनरूपी अन्नाने तो वाढतो. सामान्य अन्न शरीराचे पोषण करते, परंतु आत्म्याचे पोषण करणारे अन्न म्हणजे चिंतन होय, ज्यामुळे हृदयस्थ ईश्वराची वाढ होते. वास्तविक परमात्मा वाढत अथवा कमी होत नाही, परंतु साधकासाठी ते तसे असते. आसन घालावे.

**३. पाद्यम् –**

**बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च।**
**सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत्।।***(गीता१३-१५)*

**पाद्यम् समर्पयामि।**

ते ब्रह्म सर्व जीव धारण करणाऱ्यांच्या बाहेर व आत परिपूर्ण आहे. चर आणि अचर रूपही तोच आहे. सूक्ष्म असल्यामुळे तो दिसत नाही, अविज्ञेय आहे. मन-इंद्रियांच्या पलिकडे आहे, अगदी जवळ आणि दूरही तोच आहे.

❖ ❖ ❖

**ॐ एतावानस्य महिमातो ज्यायाँश्च पूरुष।**
**पादोऽस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृतं दिवि।। ३।।**

भूत, भविष्य आणि वर्तमानाशी संबंधित हे समस्त ब्रह्मांड त्या परमपुरुषाचे वैभव आहे आणि तो ह्या सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे. आकाश, पृथ्वी, चराचर जगत् हे सर्व त्या परमात्म्याचा एक अंश आहे. तेव्हा तोच धारण करण्यायोग्य आहे, दूसरे कोणीही नाही. पाय धुवावे.

**४. अर्घ्यम् –**

**यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते।**
**सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते।।***(गीता १३-३२)*

**अर्घ्यम् समर्पयामि।**

ज्याप्रमाणे सर्वत्र व्यापलेले आकाश सूक्ष्म असल्यामुळे कोणत्याही वस्तूशी लिप्त नसते, त्याच प्रमाणे सर्वत्र देहामध्ये स्थित असलेला आत्मा देखील गुणातीत असल्यामुळे देहाच्या गुणांनी लिप्त नसतो.

**ॐ त्रिपादूर्ध्व उदैत्पुरुषः पादोऽस्येहाभवत् पुनः।**
**ततो विष्वङ् व्यक्रामत्साशनानशने अभि।।४।।**

वर सांगितलेला तीन अंशांचा परमपुरुष उत्तम मुक्तिस्वरूप आहे, जो सृष्टिपासून पृथक प्रकट होतो. त्याच्या चरणापासून संपूर्ण जगत् उत्पन्न होते आणि तोच सर्व जड-चेतन गोष्टींमध्ये व्याप्त आहे. त्याच्याजवळ मुक्ति आहे. अर्घ्य द्यावे.

**५. आचमनीयम्-**

**यावानर्थ उदपाने सर्वतः सम्प्लुतोदके।**
**तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः।।** *(गीता २-४६)*

**आचमनम् समर्पयामि।**

सर्व बाजूंनी पूर्ण भरलेले जलाशय प्राप्त झाल्यावर मनुष्याला छोट्या जलाशयाचे जितके प्रयोजन शिल्लक रहाते, तितकेच चांगल्याप्रकारे ब्रह्म जाणणाऱ्या ब्राह्मणाला वेदांचे प्रयोजन उरते.

❖ ❖ ❖

**ॐ ततो विराडजायत विराजो अधि पूरुषः।**
**स जातो अत्यरिच्यत पश्चाद्भूमिमथो पुरः।।५।।**

त्याच परमपुरुषापासून विराट ब्रह्मांड उत्पन्न झाले व तोच ह्या विराटाचा अधिपुरुष आहे. तो उत्पन्न होऊन अत्याधिक प्रकाशित झाला. त्यानंतर त्यानेच भूमि तसेच शरीर उत्पन्न केले. तेव्हा त्यास जाणले पाहिजे. आचमन करावे.

**६. स्नानम् -**

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।।** *(गीता १८-६६)*

**स्नानम् समर्पयामि।**

संपूर्ण धर्मांचा त्याग करून केवळ मला अनन्य भावाने शरण ये, मी तुला सर्व पापांपासून मुक्त करेन. तू शोक करू नकोस.

**ॐ तस्माद्यज्ञात् सर्वहुतः सम्भृतं पृषदाज्यम्।**
**पशूँस्ताँश्चक्रे वायव्यानारण्या ग्राम्याश्च ये।।६।।**

ज्यामध्ये सर्व काही हवन केले होते, अशा यज्ञामधून घृत उत्पन्न झाले, अविष्कार झाला. त्या परमपुरुषाने यज्ञामधून हवेमध्ये राहणारे, गावात राहणारे, वनामध्ये राहणारे व इतर पशुंना उत्पन्न केले. सर्वांमध्ये त्याच परमपुरुषाचा प्रकाश आहे. त्यास जाणावे. स्नान घालावे.

**७. वस्त्रम् -**

**वासांसि जीर्णानि यथा विहाय**
**नवानि गृह्णाति नरोऽपराणि।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णा-**
**न्यन्यानि संयाति नवानि देही।।***(गीता २-२२)*

**वस्त्रम् समर्पयामि।**

ज्याप्रमाणे मनुष्य जुन्या वस्त्राचा त्याग करून नवीन वस्त्र धारण करतो, त्याचप्रमाणे जीवात्मा जुन्या शरीररूपी वस्त्राचा त्याग करून नवीन शरीर धारण करतो.

❖ ❖ ❖

**ॐ तस्माद्यज्ञात् सर्वहुतः ऋचः सामानि जज्ञिरे।**
**छन्दा सि जज्ञिरे तस्माद्यजुस्तस्मादजायत।।७।।**

ज्यामध्ये सर्व हवन केले जाते, त्याच यज्ञामधून ऋग्वेद, सामवेद प्रगट झाले, त्यामधून अथर्ववेद प्रगट झाला. त्यामधूनच यजुर्वेद म्हणजे यजन करणाऱ्या मंत्रांची उत्पत्ति झाली. अशाप्रकारे वेदांचे मूळही यज्ञच आहे. यज्ञाद्वारे त्या परमपुरुषाला जाणले पाहिजे. वस्त्र समर्पित करावे.

**८. यज्ञोपवीतम् -**

**तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः।**
**गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते।।***(गीता ३-२८)*

**यज्ञोपवीतम् समर्पयामि।**

हे महाबाहो! गुण आणि कर्माच्या विभागाला 'तत्त्ववित्' अर्थात् परमतत्त्व परमात्म्याला जाणणाऱ्या महापुरुषांनी पाहिले आणि संपूर्ण गुण गुणांमध्येच मिसळतात असे मानून ते गुण आणि कर्मांच्या कर्तेपणामध्ये आसक्त रहात नाहीत.

❖ ❖ ❖

**ॐ तस्मादश्वा अजायन्त ये के चोभयादतः।**
**गावो ह जज्ञिरे तस्मात्तस्माज्जाता अजावयः।।८।।**

त्याच परमपुरुषापासून घोडे उत्पन्न झाले. त्या व्यतिरिक्त वरती-खालती दात असणारे गाय, बकरी इत्यादि पशु-पक्षी उत्पन्न झाले. सर्वांची उत्पत्ती त्या परमात्म्या पासूनच झाली. त्या एकमात्र परमेश्वरावर विश्वास ठेवला पाहिजे, अन्य कोणीही पुजनीय नाही. यज्ञोपवीत अर्पण करावे.

**९. गन्धम् -**

**दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगन्धानुलेपनम्।**
**सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम्।।***(गीता ११-११)*

**गन्धम् समर्पयामि।**

दिव्य माळा आणि वस्त्रे धारण केलेल्या, दिव्य गंधाचे अनुलेपन केलेल्या, सर्व प्रकारच्या आश्चर्यांनी युक्त सीमारहित विराट स्वरूप परमदेवाला पाहिले.

❖ ❖ ❖

**ॐ तं यज्ञं बर्हिषि प्रौक्षन् पुरुषं जातमग्रतः।**
**तेन देवा अयजन्त साध्या ऋषयश्च ये।।९।।**

'देवाः' अर्थात् दैवी संपत्तीला हृदयामध्ये साठवून साधनेसाठी योग्य करणाऱ्या, 'साध्याः'- परमात्म्याची साधना करणारे योगाभ्यासी तसेच 'कवयः' म्हणजे मनाचा निरोध करणाऱ्या अशा ज्ञानी लोकांनी शरीरस्थ पुरुषाला साधनेद्वारे विशुद्ध केले, त्यास अग्रजन्मा अर्थात् अग्रगण्य बनविले, पुरुषोत्तम बनविले. ह्याच पद्धतीने यजन करून, आत्म-शोधन करून सर्वांनी मोक्ष प्राप्त केला. तुम्हालाही तेच केले पाहिजे. गंध-चंदन इत्यादि लावावे.

**१०. पुष्पम् -**

**मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनञ्जय।**
**मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव।।***(गीता ७-७)*

**पुष्पम् समर्पयामि।**

हे धनंजय! माझ्या शिवाय किंचितमात्र दुसरी वस्तू नाही. हे संपूर्ण जग दोऱ्यामध्ये ओवलेल्या मण्यांप्रमाणे माझ्यामध्ये गुंफलेले आहे.

❖ ❖ ❖

**ॐ यत्पुरुषं व्यदधुः कतिधा व्यकल्पयन्।**
**मुखं किमस्यासीत् किं बाहू किमूरू पादा उच्येते।।१०।।**

ज्या पुरुषाची रचना केली गेली, विचारवंत पुरुषांनी त्या परमपुरुषाची किती प्रकारे कल्पना केली, त्याचे तोंड कसे होते, हात-पाय कसे होते? हे सर्व सांगितले जाते. फुलांची माळ अर्पण करावी.

**११. धूपम् -**

**सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।**
**आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।।** *(गीता ४-२७)*

**धूपम् आघ्रापयामि।**

इंद्रियांच्या संपूर्ण विषयांना, प्राणांच्या समस्त क्रियांना ज्ञानाने प्रकाशित परमात्म-स्थितिरूपी, आत्मसंयमरूपी योगाग्निमध्ये हवन करावे.

**ॐ ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः।**
**ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत।।११।।**

ब्राह्मण त्याचे तोंड होते. क्षत्रिय दोन हात झाले. त्याच्या दोन मांड्या वैश्य झाले आणि पायांपासून शुद्र जन्माला आला. धूप लावावे.

(**विशेष** - नमूद करण्यासारखी गोष्ट आहे की केवळ शूद्रच जन्मतो कारण उत्पत्तिकाळामध्ये साधना शूद्र स्तरावरची असते. वैश्य, क्षत्रिय आणि ब्राह्मण हे स्तर विकास होत-होत प्राप्त होतात. जो साधना करत नाही तो तर शूद्रही नसतो, तो केवळ जड-जीव मात्र असतो. साधनेच्या ह्या चार श्रेणींना पार केल्यावर साधक ब्राह्मणही रहात नाही. 'न ब्राह्मण न क्षत्रिय न वैश्यो न शूद्रः चिदानन्द रूपो शिवो केवलोऽहम्' अशी स्थिती प्राप्त होते).

ह्या सोपानांची नक्कल करून समाजामध्ये चार जातीही ह्याच नावांनी बनल्या आहेत आणि त्याच प्रथेचे प्रमाण देऊन शूद्राला सर्वात निकृष्ट मानले जाते कारण तो पायांपासून जन्मला. विचार करण्यासारखी गोष्ट आहे की परमपुरुष तर सर्वत्र हात-पाय आणि तोंड असलेला होता. जेथे पाय होते तेथे डोके नव्हते का? त्याच्या एकाच पायामध्ये तर संपूर्ण सृष्टि आहे. मग तर सर्व शूद्र झाले. ज्या चरणांपासून पतितपावन गंगा निघाली त्याच चरणांपासून निघालेला शूद्र इतका अपवित्र की त्यास स्पर्श केल्यास धर्म नष्ट होईल, परमपुरुषच नष्ट होईल, केवढी ही भ्रांति!

सत्य लपवून स्मृतिकार म्हणतात की जन्माने तर सर्व शूद्र असतात. संस्कार केल्याने ते ब्राह्मण बनतात आणि संस्काराच्या नावावर जानवे

घालावयास सांगून दोन-चार मंत्र शिकवितात. जर अशाप्रकारे ब्राह्मण बनतात तर सर्वांना ब्राह्मण बनवून ते स्वतःची संख्या का वाढवित नाहीत. वस्तूतः जानवे घालणे, मंत्र म्हणणे म्हणजे संस्कार नव्हेत. 'संस्कार' शब्दाचा आशय आहे - 'स अंश आकार' - त्या परमात्म्याचा अंशात्मक आकार रुजविणे, त्याची आस उत्पन्न करणे. कर्मकांडाची इतकीच सार्थकता आहे. असो, वेदांच्या नावावर माणसा-माणसामध्ये दरी उत्पन्न करू नये. परमात्मा सर्वांमध्ये आहे आणि ह्या दृष्टिकोनातून सर्व समान आहेत, सर्वांना त्यास प्राप्त करण्याचा अधिकार आहे.

**१२. दीपम् -**

**तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः।**
**नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता।।***(गीता १०-११)*

**दीपम् दर्शयामि।**

त्या भक्तांवर पूर्ण अनुग्रह करण्यासाठी मी त्यांच्या आत्म्यापासून अभिन्न होऊन (रथी होऊन) अज्ञानाने उत्पन्न झालेल्या अंधकाराला ज्ञानरूपी दीपकाद्वारे प्रकशित करून नष्ट करतो.

❖ ❖ ❖

**ॐ चन्द्रमा मनसो जात श्चक्षोः सूर्यो अजायत।**
**श्रोत्राद्वायुश्च प्राणश्च मुखादग्निरजायत।।१२।।**

त्याच परमपुरुषाच्या मनापासून चंद्रमा उत्पन्न झाला, नेत्रांपासून सूर्य प्रगट झाला, कानांपासून वायु आणि प्राण तथा मुखापासून अग्नि उत्पन्न झाला. दिवा ओवाळावा.

**१३. नैवेद्यम् -**

**पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।**
**तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः।।***(गीता-९-१६)*

**नैवेद्यं तथा जलं निवेदयामि।**

पत्र, पुष्प, फल, जल इत्यादि मला जो कोणी भक्तिपूर्वक अर्पण करतो, मनापासून प्रसन्न करणाऱ्या त्या भक्ताचे मी सर्व काही स्विकार करतो.

❖ ❖ ❖

**ॐ नाभ्या आसीदन्तरिक्ष ँ् शीर्ष्णो द्यौः समवर्तत।**
**पद्भ्यां भूमिर्दिशः श्रोत्रात्तथा लोकाँऽकल्पयन्।।१३।।**

त्या परमपुरुषाची नाभि अंतरिक्ष होती. मस्तकापासून स्वर्ग प्रकट झाला, पायांपासून पृथ्वी, कानांपासून दिशा उत्पन्न झाल्या. अशाप्रकारे समस्त लोक त्या पुरुषामध्येच विद्यमान आहेत. कल्पना केलेले हे सर्व त्या एकाच पुरुषाच्या विभूति आहेत, त्यांना जाणा. नैवेद्य तथा जल अर्पण करा.

**१४. ताम्बूलम् –**

**देवान् भावयतानेन ते देवा भावयन्तु वः।**
**परस्परं भावयन्तःश्रेयः परमवाप्स्यथ।।***(गीता ३-११)*

**मुख शुद्ध्यर्थे ताम्बूलम् समर्पयामि।**

ह्या यज्ञाद्वारे देवतांची उन्नति करा (दैवी संपत्तीची वृद्धि करा). त्या देवता तुमची उन्नति करतील. अशाप्रकारे परस्परांची वृद्धि करीत परमश्रेय प्राप्त होईल.

❖ ❖ ❖

**ॐ यत्पुरुषेण हविषा देवा यज्ञमतन्वत।**
**वसन्तोऽस्यासीदाज्यं ग्रीष्म इध्मः शरद्धविः।।१४।।**

देवतांनी त्या पुरुषामध्येच आहुतिच्या भावनेद्वारा यज्ञ संपन्न केला. ह्या यज्ञामध्ये वसंत घृत, ग्रीष्म इंधन आणि शरद् हवि होता. अशाप्रकारे दिव्य वृत्तींनी प्रत्येक वस्तूमध्ये त्याचे चिंतन करून त्यास जाणले. तेव्हा सदैव एकमेव त्याचेच चिंतन केले पाहिजे. तांबूल (विडा) – वेलची द्यावी.

**१५. दक्षिणाम् –**

**द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे।**
**स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः।।***(गीता ४-२८)*

**दक्षिणा द्रव्यम् समर्पयामि।**

द्रव्य संबंधी यज्ञ (आत्मपथामध्ये सत्पुरुषासाठी द्रव्य देणे हा ही एक यज्ञ आहे), तप-संबंधी यज्ञ (आत्मपथामध्ये इंद्रियांचा संयम), योग-यज्ञ करणे तसेच अहिंसादि कठोर व्रतांनी युक्त राहून प्रयत्नपूर्वक 'स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च' स्वतःचे अध्ययन करणे, ह्या सर्व गोष्टींमुळे स्वरूपाची प्राप्ति होते.

❖ ❖ ❖

**हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत्।**
**स दाधार पृथिवीं द्यामुते मां कस्मै देवाय हविषा विधेम्।।**

**( ऋग्वेद, १/१२१/१ )**

अर्थात् सोन्यासारखा चमकणारा परमात्मा सर्वात आधी उत्पन्न झाला. जन्म घेतलेल्या सर्व प्राण्यांचा तो एकमात्र पति झाला. त्यानेच पृथ्वी व आकाशाला धारण केले. त्याच्या व्यतिरिक्त कोणत्या देवाची आहुतिद्वारे पूजा करावी? द्रव्य अर्पण करावे.

**१६. प्रदक्षिणाम् -**

**नमः पुरस्तात् अथ पृष्ठतः ते**
**नमः अस्तु ते सर्वतः एव सर्व।**
**अनन्तवीर्य अमितविक्रमः त्वम्**
**सर्वम् समाप्नोषि ततः असि सर्वः।।** *(गीता ११-४०)*

**प्रदक्षिणां निवेदयामि।**

हे अत्यंत सामर्थ्यवान! आपणाला पुढून व पाठीमागूनही नमस्कार. हे सर्वात्मन्! आपणाला सर्व बाजूंनी नमस्कार, कारण हे पराक्रमशाली! आपण सर्व बाजूंनी जगताला व्यापलेले आहे, म्हणून आपणच सर्वरूप आणि सर्वत्र आहात.

❖ ❖ ❖

**ॐ सप्तास्यासन् परिधयस्त्रिः सप्त समिधः कृताः।**
**देवा यद्यज्ञं तन्वाना अबध्नन् पुरुषं पशुम्।।१५।।**

दैवी संपत्तीने युक्त असणाऱ्या लोकांनी यज्ञ करताना योगाच्या सात भूमिकांमध्ये प्रकृति, महतत्त्व, अहंकार, पंच स्थूलभूत, पंच सूक्ष्मभूत, पंच ज्ञानेंद्रिये आणि तीन गुण अशा एकवीस समिधांचे हवन करून त्या पुरुषरूपी पशूला बांधून टाकले. ह्या सर्वांचे हवन झाल्यावर जो शेष रहातो, त्यास जाणा. साधनेद्वारा तो अवश्य प्राप्त होतो. प्रदक्षिणा घालावी.

**१७. पुष्पांजली -**

**वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशाङ्कः**
**प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च।**
**नमो नमस्तेऽस्तु सहस्त्रकृत्वः**
**पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते।।** *(गीता ११-३९)*

आपणच वायु, यमराज, अग्नि, वरुण, चंद्रमा तथा प्रजेचे स्वामी, ब्रह्मा आणि ब्रह्माचेही पिता आहात. आपणाला हजार वेळा नमस्कार, तरीही परत-परत नमस्कार असो.

❖ ❖ ❖

**ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्।**
**ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः।।१६।।**

दैवी संपत्तीला हृदयात साठविणाऱ्यांनी परमपुरुषाच्या प्राप्तिरूपी उपरोक्त यज्ञाद्वारे यज्ञरूपी परमपुरुषाचे यजन केले. अशाप्रकारे यज्ञाद्वारे सर्वप्रथम धर्माची उत्पत्ति होते. धर्माच्या आचरणाने दैवी संपत्तीने संपन्न असलेले लोक महान गौरवशाली होऊन अशा स्वर्गलोकाचे सेवन करतात, जेथे साधनसंपन्न योगी आणि दैवीगुण संपन्न लोक निवास करतात. पुष्पांजली समर्पित करावी.

(नोट – खालील दोन मंत्र ऋग्वेदामध्ये नाहीत, परंतु 'मूल उपनिषद', 'परमात्मिकोपनिषद्', 'महावाक्योपनिषद्', चित्युपनिषद्' ह्यांमध्ये पुरुष–सूक्ताच्या नावाने आहेत.)

**ॐ वेदाहमेतं पुरुषं महान्तमादित्यवर्णं तमसस्तु पारे।**
**सर्वाणि भूतानि विचिन्त्य धीरो नामानि कृत्वाभिवदन् यदास्ते।।१७।।**

मी त्या महान पुरुषाला जाणले आहे, जो सूर्याप्रमाणे प्रकाशस्वरूप व अंधकाराच्या पलिकडे आहे. (काही ठीकाणी 'तमसः परस्तात्' असे म्हटले जाते.) तोच सर्व रूपांची रचना करून त्यांचे नामकरण करतो आणि सर्वांच्या बुद्धिमध्ये रमण करून व्यवहार करतो. तोच इष्ट आहे.

**ॐ धाता पुरस्ताद्यमुदाजहार शक्रः प्रविद्वान् प्ररिशश्चतस्त्रः।**
**तमेवंविदित्वातिमृत्युमेति नान्यः पन्था विद्यतेऽयनाय।।१८।।**

पूर्वी ब्रह्माने ज्याची स्तुति केली होती, इंद्राने ज्यास चारही दिशांमध्ये व्याप्त असलेले जाणले होते, त्या परमपुरुषाला जो जाणतो, तो येथे, ह्याच जन्मात अमृतपद प्राप्त करतो, ह्या व्यतिरिक्त अमर होण्याचा अन्य कोणताही मार्ग नाही. त्या एकमात्र परमेश्वरावर विश्वास ठेवला पाहिजे आणि ह्याच जीवनात त्याला प्राप्त केले पाहिजे.

❖ ❖ ❖

पुरुष–सूक्ताच्या ह्या मंत्रांच्या अभ्यासाने हे स्पष्ट होते की एका परमात्म्याठायी आपली श्रद्धा स्थिर करणे हेच कर्मकांडाचे ध्येय आहे. त्या परमात्म्याला बाहेर कोठेही शोधावयाचे नाही. पुरुष–सूक्तानुसार ह्या परमात्म्याला केवळ मानसिक यज्ञाद्वारेच प्राप्त केले जाते, दुसरा कोणताही मार्ग नाही. ज्याचा आशय केवळ इतकाच आहे की भगवंतासाठी हृदय पवित्र बनविले पाहिजे. स्वच्छता आणि समर्पणाची भावना हृदयामध्ये आणली पाहिजे. बाहेर तर केवळ नमूना आहे. शेवटी

परमात्म्याला अर्पण केलेल्या सात्विक वस्तू आपसात वाटून खाण्याची प्रथा आहे ज्यामूळे अत्मियता, संघटन व एकता निर्माण होईल.

सर्व पुरोहितांनी सदैव ध्यानात ठेवावे की एका परमात्म्याव्यतिरिक्त अन्य देव-देवताकडे लोकांची श्रद्धा नेऊ नये, कारण ब्रह्मा सकट सर्व जग जन्म-मृत्युच्या चक्रात अडकलेले आहे. ज्यांना काहीच अस्तित्व नाही त्यांना उत्तेजन देणे हे अज्ञानी लोकांचे काम आहे. अस्तित्त्वहीन गोष्टीला महत्व देणे म्हणजे नास्तिकतेला प्रोत्साहित करणे होय.

**विद्याविनयसम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि।**
**शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः।।** *(गीता ५-१८)*

विद्या-विनययुक्त ब्राह्मण तथा चांडाळ, गाय-कुत्रा आणि हत्ती हे सर्व पंडितजनांच्या दृष्टिने समान असतात. तेव्हा पंडितजनांनी अशा उदार दृष्टिकोनाचे पालन करावे आणि मानवमात्राच्या हितासाठी पद्मनाभ भगवान कृष्णांच्या श्रीमुखातून विसृत झालेल्या गीतेवर आधारित ह्या कल्याणप्रद प्रणालीचा समाजात प्रसार करावा.

**हरि ॐ शान्तिः! शान्तिः!! शान्तिः!!!**

**।।इति षोडशोपचार पूजन-पद्धति समाप्त।।**

# ॥अथ हवन-पद्धति॥

अग्निला हवि-वाहक म्हटले जाते. असे मानले जाते की ज्या देवांसाठी हवि अर्पित केली जाते त्या देवांपर्यंत ती पोहोचविण्याचे काम अग्नि करतो; परंतु वास्तविकता ही आहे की अग्निमध्ये भगवंतापर्यंत पोहोचण्याची शक्तिच नाही. गीतेमध्ये म्हटले आहे - **'न तद् भासयते सूर्यो न शशांको न पावकः। यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम॥** *(१५/६)*. भगवंताच्या त्या परमधामाला ना सूर्य प्रकाशित करू शकतो, ना चंद्रमा. अग्निमध्येही तेथे पोहोचण्याचे सामर्थ्य नाही. ज्योतिर्मय परमात्म्याच्या समक्ष सर्व प्रकारचे प्रकाश क्षीण होऊन जातात परंतु अग्नि अनिष्टाला जाळू शकतो, नष्ट करू शकतो, त्यानंतर शुभ संकल्पांसहित परमात्म्याच्या स्मरणाने मंगल विधानांची रचना होऊ लागते. तेव्हा हवन करताना परमात्म्याचा महिमा सांगणारे श्लोक म्हटले गेले पाहिजेत आणि त्या बरोबर 'ॐ परमात्मने स्वाहा। इदम् परमात्मने न मम।' अशी कामना केली पाहिजे. श्रीमद्भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायात म्हटले आहे -

**पश्यामि देवांस्तव देव देहे**
**सर्वांस्तथा भूतविशेषसङ्घान्।**
**ब्रह्माणमीशं कमलासनस्थ-**
**मृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान्॥***(गीता ११/१५)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

हे देवा! आपल्या शरीरात संपूर्ण देव तसेच अनेक भूत-समुदाय, कमलासनस्थ ब्रह्मदेव, महादेव, संपूर्ण ऋषि तसेच दिव्य सर्प मी पहात आहे.

**अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं**
**पश्यामि त्वां सर्वतोऽनन्तरूपम्।**
**नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं**
**पश्यामि विश्वेश्वर विश्वरूप॥***(गीता ११/१६)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

हे विश्वाचे स्वामी! मी आपल्याला अनेक हात, उदर, मुख आणि नेत्र असलेला तसेच सर्व बाजूंनी अनंत रूप असलेला पहात आहे. हे विश्वरूपा! मी आपला आदि आणि अंत पाहू शकत नाही अर्थात् आपल्या आदि, मध्य आणि अंताचा निर्णय करू शकत नाही.

**किरीटिनं गदिनं चक्रिणं च**
**तेजोराशिं सर्वतो दीप्तिमन्तम्।**
**पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समन्ता-**
**द्दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम्** ।।*(गीता-११/१७)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

मी आपणाला मुकुटधारी, गदाधारी, चक्रधारी, सर्व बाजूंनी प्रकाशमान तेज:पुंज स्वरूप, प्रज्वलित अग्नि आणि सूर्याप्रमाणे पहाण्यास दुष्कर, अर्थात् प्रयत्नाने पाहता येणारा आणि सर्व बाजूंनी बुद्धिने ग्रहण करता न येणारा, अप्रमेय पाहत आहे.

**त्वमक्षरं परमं वेदितव्यं**
**त्वमस्य विश्वस्य परं निधानम्।**
**त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता**
**सनातनस्त्वं पुरुषो मतो मे।।***(गीता-११/१८)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

भगवंत! आपण जाणण्यास योग्य परम अक्षर (अक्षय परमात्मा) आहात. आपण ह्या जगताचे परम आश्रय आहात, आपण शाश्वत धर्माचे रक्षक आहात, तथा आपण अविनाशी सनातन पुरुष आहात – असे माझे मत आहे.

**अनादिमध्यान्तमनन्तवीर्य-**
**मनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम्।**
**पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं**
**स्वतेजसा विश्वमिदं तपन्तम्।।***(गीता-११/१९)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

हे परमात्मन्! मी आपणाला आदि, मध्य व अंत रहित, अनंत सामर्थ्याने युक्त असलेला, अनंत हात असलेला, चंद्र आणि सूर्यरूपी नेत्र असलेला तसेच प्रज्वलित अग्निरूपी मुख असलेला व स्वत:च्या तेजाने ह्या जगतालाही तेजोमय करणारा पाहत आहे.

**द्यावापृथिव्योरिदमन्तरं हि**
**व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः।**
**दृष्ट्वाद्भुतं रूपमुग्रं तवेदं**
**लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन्।।***(गीता-११/२०)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

हे महात्मन्! एकमात्र आपणामुळेच अंतरिक्ष आणि पृथ्वी ह्यांमधील संपूर्ण आकाश तसेच सर्व दिशा परिपूर्ण भरलेल्या आहेत. आपल्या ह्या अलौकिक, भयंकर रूपाला पाहून तीनही लोक व्यथित होत आहेत.

**अमी हि त्वां सुरसङ्घा विशन्ति**
**केचिद्भीताः प्राञ्जलयो गृणन्ति।**
**स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसङ्घाः**
**स्तुवन्ति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः।।** *(गीता-११/२१)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

समस्त देवतांचे समूह आपल्यामध्ये प्रवेश करीत आहेत आणि कोणी भयभीत होऊन हात जोडून आपले गुणगान करीत आहेत – आपले स्तवन करीत आहेत. महर्षि आणि सिद्धांचा समुदाय स्वस्तिवाचन अर्थात् कल्याण होवो असे म्हणत स्तोत्रांनी आपली स्तुती करीत आहेत.

**रुद्रादित्या वसवो ये च साध्या**
**विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च।**
**गन्धर्वयक्षासुरसिद्धसङ्घा**
**वीक्षन्ते त्वां विस्मिताश्चैव सर्वे।।** *(गीता-११/२२)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

रुद्र, आदित्य, वसु, साध्य, विश्वदेव, अश्विनीकुमार, वासुदेव आणि अग्नि तसेच गंधर्व, यक्ष, राक्षस व सिद्धांचा समुदाय सर्व आश्चर्याने आपल्याकडे पाहत आहेत.

**रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं**
**महाबाहो बहुबाहूरुपादम्।**
**बहूदरं बहुदंष्ट्राकरालं**
**दृष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाहम्।।** *(गीता-११/२३)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

हे महाबाहो! आपले अनंत मुखे व नेत्र असलेले, अनेक हात, मांड्या व पाय असणारे, अनेक उदरे असलेले, अनेक दाढांच्या योगाने भीषण असलेले प्रचंड स्वरूप पाहून सर्व लोक व्याकुळ झाले आहेत, मी देखील व्याकुळ झालो आहे.

**नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं**
**व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम्।**
**दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितान्तरात्मा**
**धृतिं न विन्दामि शमं च विष्णो।।** *(गीता-११/२४)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

विश्वामध्ये सर्वत्र अणुरूपाने व्यापून असणाऱ्या हे विष्णो, आकाशाला स्पर्श करणाऱ्या, तेजस्वी, अनेक प्रकारच्या रूपांनी युक्त असणाऱ्या, जबडा पसरलेल्या, तेजस्वी व विशाल नेत्र असणाऱ्या तुम्हांला पाहून माझा अंतरात्मा व्याकुळ होऊन गेला आहे. त्यामुळे माझा धीर सुटला आहे व समाधानरूपी शांतीदेखील मला मिळेनाशी झाली आहे.

**दंष्ट्राकरालानि च ते मुखानि**
**दृष्ट्वैव कालानलसन्निभानि।**
**दिशो न जाने न लभे च शर्म**
**प्रसीद देवेश जगन्निवास।।** *(गीता-११/२५)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

आपली विक्राळ दाढा असणारी, प्रलयकाळाच्या अग्नीप्रमाणे (काळासाठीही परमात्मा अग्नी आहे) प्रज्वलित असणारी मुखे पाहून मी इतका घाबरून गेलो आहे की, मी दिशादेखील ओळखू शकत नाही-जाणू शकत नाही. चोहीकडे प्रकाश पाहून मला दिशाभ्रम होऊ लागला आहे, आपले हे भयंकर रूप पाहून मी अस्वस्थ झालो आहे, मला ते पाहून सुख वाटत नाही तेव्हा देवेशा, जगन्निवासा, आपण माझ्यावर प्रसन्न व्हा.

**अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः**
**सर्वे सहैवावनिपालसङ्घैः।**
**भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ**
**सहास्मदीयैरपि योधमुख्यैः।।** *(गीता-११/२६)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

धृतराष्ट्राचे सर्व पुत्र राजांच्या समुदायांसह तुमच्यामध्ये प्रवेश करीत आहेत. आणि पितामह भीष्म, द्रोणाचार्य तसेच तो कर्ण (ज्याचे अर्जुनाला फार भय वाटत होते तो कर्ण), तसेच आमच्याकडील सुद्धा मुख्य योद्धे-

**वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति**
**दंष्ट्राकरालानि भयानकानि।**
**केचिद्विलग्ना दशनान्तरेषु**
**सन्दृश्यन्ते चूर्णितैरुत्तमाङ्गैः।।** *(गीता-११/२७)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

अत्यंत वेगाने आपल्या विक्राळ दाढांच्या भयावह मुखात प्रवेश करीत आहेत; तसेच त्यांच्यापैकी कित्येक चूर्ण झालेली मस्तके आपल्या दातांमध्ये अडकलेली दिसत आहेत. ते किती वेगाने आत प्रवेश करीत आहेत? आता त्यांचा वेग पाहा-

**यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः**
**समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति।**
**तथा तवामी नरलोकवीरा**
**विशन्ति वक्त्राण्यभिविज्वलन्ति।।** *(गीता-११/२८)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

ज्याप्रमाणे नद्यांचे अनेक जलप्रवाह समुद्राकडे धावतात, समुद्रात प्रवेश करतात, त्याप्रमाणे हे शूरवीर-पराक्रमी असे माणसांचे समुदाय सर्व बाजूंनी जळत असणाऱ्या तुझ्या तोंडात प्रवेश करीत आहेत.

**यथा प्रदीप्तं ज्वलनं पतङ्गा**
**विशन्ति नाशाय समृद्धवेगाः।**
**तथैव नाशाय विशन्ति लोका-**
**स्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः।।** *(गीता-११/२९)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

ज्याप्रमाणे पतंग जणू नष्ट होण्यासाठीच प्रज्वलित अग्नीमध्ये अत्यंत वेगाने प्रवेश करतात, त्याप्रमाणे ते सर्व प्राणी आपल्या नाशासाठी तुमच्या मुखामध्ये अत्यंत वेगाने प्रवेश करीत आहेत.

**लेलिह्यसे ग्रसमानः समन्ता-**
**ल्लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः।**
**तेजोभिरापूर्य जगत्समग्रं**
**भासस्तवोग्राः प्रतपन्ति विष्णो।।** *(गीता-११/३०)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

आपण त्या सर्व लोकांना आपल्या जळत असणाऱ्या मुखांनी सर्व बाजूंनी गिळीत, चाटत आहात, त्यांचा स्वाद घेत आहात. सर्वत्र व्याप्त असणाऱ्या हे परमात्मा! आपले उग्र तेज सर्व जगाला व्यापून चोहीकडे तळपत आहे.

**आख्याहि मे को भवानुग्ररूपो**
**नमोऽस्तु ते देववर प्रसीद।**
**विज्ञातुमिच्छामि भवन्तमाद्यं**
**न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम्।।** *(गीता–११/३१)*

**ॐ परमात्मने स्वाहा। इदं परमात्मने न मम।**

हे उग्ररूप धारण केलेले आपण कोण आहात? हे देवश्रेष्ठ! आपल्याला नमस्कार असो. आपण माझ्यावर प्रसन्न व्हावे. आदिदेवा! आपण कोण आहात हे जाणून घेण्याची माझी इच्छा आहे, कारण आपली ही प्रवृत्ती अर्थात् आपली ही करणी मला काहीच समजत नाही.

# आरती

**कविं पुराणमनुशासिता**
**मणोरणीयांसमनुस्मरेद्यः ।**
**सर्वस्य धातारमचिन्त्यरूप**
**मादित्यवर्णं तमसः परस्तात्।।** *(गीता–८/९)*

**आरार्तिक्यं निवेदयामि।।**

तो पुरुष सर्वज्ञ, अनादि, सर्व विश्वाचा नियंता, सूक्ष्मापेक्षाही अतिसूक्ष्म, सर्वांचे भरण–पोषण करणाऱ्या, अचिन्त्य, नित्य प्रकाशस्वरूप आणि अज्ञानरूपी अंध:काराच्या पलिकडे असलेल्या त्या परमात्म्याचे चिंतन करतो.

❖ ❖ ❖

# क्षमा-प्रार्थना

**यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि**
**विहारशय्यासनभोजनेषु ।**
**एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं**
**तत्क्षामये त्वामहमप्रमेयम्।।** *(गीता–११/४२)*

हे अच्युता, क्रीडा, शयन, आसन आणि भोजन इत्यादि प्रसंगी थट्टेने एकांती किंवा सर्वांसमक्ष मी आपला अपमान केला असेल; तर अचिंत्यप्रभाव अशा तुझी मी क्षमा मागतो. मला कशा प्रकारे क्षमा कराल?

**पितासि लोकस्य चराचरस्य**
**त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान्।**
**न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो**
**लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव ।।** *(गीता–११/४३)*

आपण ह्या चराचर जगताचे पिता, गुरूंचेही महान गुरू आणि अति पूजनीय आहात. ज्यांची कोणतीही प्रतिमा नाही असे अप्रतिम प्रभाव असणारे आहात. आपल्या सारखा त्रैलोक्यात दुसरा कोणी नाही.

**तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं**
**प्रसादये त्वामहमीशमीड्यम्।**
**पितेव पुत्रस्य सखेव सख्युः**
**प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम्।।** *(गीता-११/४४)*

**क्षमा प्रार्थनां निवेदयामि।।**

आपण चराचर जगताचे पिता आहात, म्हणून मी माझे शरीर आपल्या चरणांशी ठेवून प्रणाम करीत आहे, आणि स्तुती करण्यास योग्य अशा आपण प्रसन्न व्हावे म्हणून प्रार्थना करत आहे. हे देवा, पिता जसा पुत्राच्या, मित्र जसा मित्राच्या आणि पती ज्याप्रमाणे पत्नीच्या अपराधाबद्दल क्षमा करतो; त्याप्रमाणे आपणही माझ्या अपराधाबद्दल क्षमा करण्या योग्य आहात.

**हरि ॐ शन्ति! शान्ति!! शान्ति!!!**

**।।इति हवन-पद्धति समाप्त।।**

।।ॐ श्री परमात्मने नमः।।

# ।।अथ षोडश संस्कार।।

(श्रीमद्भगवद्गीता द्वारा)

**१. गर्भाधान संस्कार –** (परमात्म्यापासून उत्पत्ति)

**सर्व योनिषु कौन्तेय मूर्तयः सम्भवन्ति याः।**
**तासाम् ब्रह्म महत् योनिः अहम् बीजप्रदः पिता।।** *(गीता-१४-४)*

हे कौन्तेया, सर्व योनींमध्ये जेवढे शरीरधारी प्राणिमात्र उत्पन्न होतात, त्यासर्वांची 'योनि:' (गर्भ धारण करणारी माता) आठ भेदांची ही मूळ प्रकृती आहे आणि मी बीज स्थापन करणारा पिता आहे.

**२. पुंसवन संस्कार –** (पुरुषत्वाच्या प्राप्तिसाठी प्रार्थना. परमात्म्यास प्राप्त करणे हाच सर्वोत्कृष्ठ पुरुषार्थ होय.)

**क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते।**
**क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परन्तप।।** *(गीता-२-३)*

अर्जुना! तू नामर्द बनू नकोस. ते तुझ्यासाठी योग्य नाही. हे परंतपा! हृदयाच्या ह्या शूद्र दुर्बलतेचा त्याग करून युद्धाला तयार हो.

(मूल मोठे झाल्यावर पुरुषार्थी आणि धर्मनिष्ठ व्हावे हे पुंसवन संस्काराचे उद्दिष्ट असते. पुत्र प्राप्ती व्हावी हा त्याचा आशय नाही. उत्तमप्रकारे पुंसवन संस्कार करूनही बऱ्याचशा माता-पितांना कन्याच होतात, पुत्रांपासून ते वंचित राहतात. पुंसवन संस्काराचा आशय आहे मुलांमध्ये धर्मनिष्ठ, बलशाली आणि पुरुषार्थी बनण्याची प्रेरणा उत्पन्न करणे. अर्जुनाने सुभद्रेला चक्रव्यूहाची माहिति सांगितली त्यामुळे तिच्या उदरात असलेला अभिमन्यु युद्धकलेमध्ये निष्णात झाला. अष्टावक्र ऋषिंचे पिता वेदपठण करीत व त्यांची आई तल्लीन होऊन ते ऐकत असे. परिणामी अष्टावक्रांना वेद ज्ञात झाले. प्रल्हादाची आई कयाधु हीस देवर्षि नारदांनी विष्णुची भक्ति करावयास सांगितली होती, त्याचा प्रभाव प्रल्हादाच्या जीवनचर्येवर झालेला पहावयास मिळतो. म्हणून गर्भावस्थेमध्ये तिसऱ्या महिन्यात पुंसवन संस्कार करताना रोज नियमित 'यथार्थ गीता' वाचून दाखवावी. स्त्रियांनी एकाग्रपणे ती ऐकावी. त्यामुळे बाळ शौर्यसंपन्न, आज्ञाधारक व सर्वगुण संपन्न होईल).

**३. सीमन्तोन्नयन संस्कार –** (केस कापणे)

**अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।** *(गीता-९-२२)*

'अन्यन भावाने' माझ्या ठिकाणी स्थिर असणारे भक्तजन माझ्या परमात्म स्वरूपाचे निरंतर चिंतन करतात. सतत माझ्या ठायी अन्यन भावाने युक्त असणाऱ्या त्या पुरुषांचा योगक्षेम मी स्वतः चालवितो. (एका परमात्म्यालाच कायम शरण जावे, त्याचेच स्मरण करावे. गीतेनुसार 'ओम्' चा जप करणे श्रेयस्कर आहे).

**४. जातकर्म संस्कार –** (जन्मानंतर करण्यात येणारी पूजा)

**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।**
**मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति।।** *(गीता-१५-७)*

या 'जीवलोकात' म्हणजे या देहात (शरीरही एक लोकच आहे) असणारा हा जीवात्मा माझा – परमात्म्याचाच सनातन अंश आहे आणि तोच त्रिगुणात्मक प्रकृतीत स्थित असणाऱ्या मनासह पाच इंद्रियांना आकर्षित करीत असतो.

**५. नामकरण संस्कार –** (मंगलमय विकासोन्मुख नाव ठेवताना करण्यात येणारी पूजा)

**ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः।**
**ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा।।** *(गीता-१७-२३)*

ओम्, तत् आणि सत् असा तीन प्रकारचा ब्रह्माचा नामनिर्देश ब्रह्माची स्मृती देववितो. या नामाच्या योगाने पूर्वी ब्राह्मण, वेद आणि यज्ञादि रचले गेले आहेत. अर्थात् ब्राह्मण, वेद आणि यज्ञ ओम् पासून निर्माण होतात.

**६. निष्क्रमण संस्कार –** (आपल्या हृदयाच्या मलिन अवस्थेमधून बाहेर पडणे).

**ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः।**
**जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः।।** *(गीता-१४-१८)*

सत्वगुणी पुरुष 'ऊर्ध्वमूलम्' – त्या मूल परमात्म्याकडे प्रवाहित होतात. रजोगुणी म्हणजे राजस आचरणाचे पुरुष मध्यम श्रेणीचे असतात आणि निंद्यगुणी असे तामस वृत्तीचे पुरुष 'अधोगति' अर्थात् पशु-पक्षी-कीटक-पतंग इत्यादि अधम योनीत जातात. तेव्हा मातांनी ह्या अवस्थेपासून सात्विक मार्ग निवडला पाहिजे. आपले कर्तव्य काय आहे हे त्यांनी जाणले पाहिजे.

**७. अन्नप्राशन संस्कार –** (‘अन्न’ म्हणजे काय? ब्रह्मामृताचे सेवन करण्याचा मार्ग दाखविणे).

**अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः।**
**प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम्।।** *(गीता–१५–१४)*

मीच सर्व प्राण्यांच्या शरीरात अग्नीरूपाने स्थित होऊन प्राण आणि अपानांनी युक्त असणारे चार प्रकारचे अन्न पचवितो.

**८. जावळ काढणे –** (शेंडी ठेवणे)

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।।** *(गीता–१८–६६)*

सर्व धर्मांना सोडून केवळ मला अनन्य भावाने शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करेन. तू शोक करू नकोस.

**९. कर्णवेध संस्कार –** (इतर चर्चा न ऐकता कानांना केवळ ध्येयावर केंद्रित करणे)

**सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः।**
**इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम्।।** *(गीता–१८–६४)*

सर्व गुह्यातील गुह्य असे माझे रहस्ययुक्त वचन–ज्ञान तू पुन्हा ऐक कारण तू मला अतिशय प्रिय आहेस. यासाठी हे अत्यंत हितावह ज्ञान मी तुझ्यासाठी पुन्हा सांगेन.

**१०. विद्यारंभ संस्कार –** (शिक्षणास आरंभ करण्याच्या हेतुने केलेले पूजन)

**कार्पण्यदोषोपहतस्वभावः**
**पृच्छामि त्वां धर्मसम्मूढचेताः।**
**यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे**
**शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्।।** *(गीता–२–७)*

माझ्या भेकड दुर्बल स्वभावामुळे धर्माधर्म जाणण्याच्या बाबतीत मी मोहग्रस्त झालो आहे व म्हणून मी आपल्याला विचारीत आहे. जे निश्चित परम कल्याणकारी साधन आहे ते मला सांगा. मी आपला शिष्य आहे. आपल्याला शरण आलो आहे, मला सांभाळून घ्या.

**११. उपनयन संस्कार –** (परमेश्वर निकट असण्याची भावना प्राप्त करणे).

**भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन।**
**ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परन्तप।।** *(गीता–११–५४)*

हे श्रेष्ठ तप करणाऱ्या अर्जुना, अनन्य भक्तिद्वारा (अर्थात् माझ्याशिवाय अन्य देवतांचे स्मरण न करता) अनन्य श्रद्धेने मी अशाप्रकारे प्रत्यक्ष पाहाण्यास, जाणण्यास व माझ्या ठायी तत्त्वाने प्रवेश करण्यास सुलभ आहे.

**१२. वेदारम्भ संस्कार –** (अविदित परमात्म्याला जाणण्याच्या हेतूने केलेले पूजन).

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः।।** *(गीता–४–३४)*

अर्जुना! तू तत्त्वदर्शी महापुरुषाकडे जाऊन त्यांची चांगल्या प्रकारे नम्रपणे सेवा करून, निष्कपट भावाने त्यांना प्रश्न विचारून ते ज्ञान प्राप्त कर. तत्त्वाला जाणणारे ते ज्ञानीपुरुष तुला त्या ज्ञानाचा उपदेश करतील.

**१३. केशान्त संस्कार –** (आपले समस्त विचार आचार्यांना समर्पित करणे).

**अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः।**
**स सन्न्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः।।** *(गीता–६–१)*

अर्जुना! कर्मफलाचा आश्रय न करता जो 'कार्यम् कर्म' – कर्तव्य कर्म करतो तोच खरा संन्यासी, तोच खरा योगी होय. केवळ अग्निचा वा क्रियेचा त्याग करणारा ना संन्यासी आहे, ना योगी.

**१४. समावर्तन –** (गुरुकुलातून प्रस्थान. जे शिकलेले आहे त्याचा लोकहितार्थ उपयोग करणे).

**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत।**
**स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव।।** *(गीता–१८–७३)*

अच्युता! आपल्या कृपेने माझा मोह नष्ट झाला आहे, मला स्मृति प्राप्त झाली आहे, आता मी संशयरहित झालो आहे आणि आपल्या आज्ञेचे पालन करेन.

**१५. विवाह संस्कार –** (परमात्म्यावर श्रद्धेने भरलेल्या हृदयाने गृहस्थ जीवनास सुरुवात करणे).

**समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः।**
**ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम्।।** *(गीता–९–२९)*

सृष्टिमध्ये ना मला कोणी प्रिय आहे व ना अप्रिय परंतु जो अनन्य भक्त आहे तो माझ्याठायी असतो व मी त्याच्याठायी.

**१६. अन्त्येष्टि संस्कार -** (एका परमात्म्यास प्राप्त करण्याच्या हेतूने 'ॐ' चा जप).

**ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन्।**
**यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्।।** *(गीता-८-१३)*

जो पुरुष 'ओम्' चा, जो अक्षय ब्रह्माचा परिचय देणारा आहे, त्याचा जप व माझे स्मरण (ध्यान) करीत शरीराचा त्याग करतो, त्यास परमगति प्राप्त होते.

**हरि ॐ शान्ति! शान्ति!! शान्ति!!!**

**।। इति षोडश संस्कार समाप्त ।।**

# निष्कर्ष

गीतेच्या सोळाव्या अध्यायात भगवान श्रीकृष्ण म्हणतात – **द्वौ भूतसर्गो लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च।** *(१६/६)* अर्जुना! ह्या लोकी प्राण्यांचे स्वभाव दोन प्रकारचे असतात – देवतांसारखा आणि असुरांसारखा. जेव्हा हृदयामध्ये दैवी संपत्ती कार्यान्वित असते तेव्हा तो मनुष्य देवता असतो आणि जेव्हा आसुरी संपत्तीचे प्राबल्य होते तेव्हा तो मनुष्य असुर असतो. सृष्टिमध्ये ह्या दोनच जाती आहेत.

अशाप्रकारे देव समुदाय ही हृदयामध्ये असणारी वस्तु आहे; परंतु कालांतराने सत्पुरुषांचे दर्शन व सान्निध्य ह्याच्या अभावामुळे, राजनैतिक दबाव आणून शिक्षणाला केवळ विशिष्ट श्रेणीच्या लोकांपर्यंत मर्यादित ठेवले गेले व भोळ्या जनतेमध्ये हृदयाच्या बाहेर देवता नावाच्या वस्तुचा अगदी सहजपणे प्रसार केला गेला.

पूजा तर एका ईश्वराचीच व्हायची परंतु स्मृति–पुराण काळात देवतांच्या नावावर आकृत्या आणि पुस्तके तयार केली गेली जी वैदिक ऋषिंच्या मते अनुचित आहेत. गीतेच्या सातव्या अध्यायात भगवान श्रीकृष्ण म्हणतात की एका परमात्म्याशिवाय दुसरीकडे कोठेही कल्याण होत नाही, कोणतेही शरण जाण्यायोग्य स्थळ नाही; परंतु कामनांनी ज्यांची बुद्धि पराभूत झालेली असते, असे मूढबुद्धि असलेले अविवेकी लोक अन्य–अन्य देवी–देवतांची पूजा करतात. एका परमात्म्या व्यतिरिक्त अन्य देवतांची पूजा करणे हा अविवेक तथा मूढबुद्धिचा परिणाम आहे.

तेव्हा सर्व विद्वान पुरुषांनी जेथे देवी–देवता असे लिहिलेले असेल तेथे भगवंत अथवा भगवंताच्या कोणत्याही नावाच्या प्रति श्रद्धा भावना स्थिर करावी, ज्यामुळे ते सत्याबद्दल जागरुक होतील आणि भगवंताचा अंशात्मक संस्कार प्राप्त करतील – हाच विधि होय.

सर्व तीर्थस्थाने व देवळे योग्यच आहेत. देवळांमध्ये स्थापित केलेल्या देवता त्या–त्या काळातील आपले पूर्वज आहेत, ज्यांनी हृदयामध्ये दैवी संपदेचा उत्कर्ष करून परमात्म्याचा साक्षात्कार केला व स्थिति प्राप्त केली. ते सदैव पूजनीय राहतील, त्यांचा आशिर्वाद अनिवार्य आहे. देऊळ आपले जणू पुस्तक आहे, जेथे आपली संस्कृति सुरक्षित ठेवली जाते – त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आपण सर्वांनी त्या देवतांप्रमाणेच परमप्रभूचा शोध घेण्यासाठी अग्रेसर झाले पाहिजे. त्यांनी जशी साधना केली तशीच आपण केली पाहिजे व त्यांनाच शरण गेले पाहिजे ज्यांना ह्या देवता म्हणजेच पूर्वीचे महापुरुष शरण गेले.

जगातींल सर्व धर्मांमध्ये कर्मकांड असते व त्यावेळी त्या-त्या धर्मशास्त्राचे पठण केले जाते. आपण कर्मकांड करताना काय करावे? धर्मशास्त्राच्या रूपामध्ये गीता प्रस्तुत करावी. पुरुष-सूक्त, स्वस्तिनः इत्यादि प्राचीन मंत्रही म्हटले तरी चालतील परंतु धर्मशास्त्र म्हणून गीतेचेच पठण करावे.

❖ ❖ ❖

**विशेष** - सोळा संस्कारांमध्ये जन्म, अन्नप्राशन, विवाह, अंत्येष्टि आणि गृहप्रवेश ह्या मुख्य संस्कारांच्या वेळी पूजेच्या ठिकाणी विविध चिन्हे, प्रतीके बनवली जातात जी कल्याण सूचक आहेत व पूर्वजांनी शोधून काढली आहेत. ही प्रतीके जशीच्या तशी बनवावी परंतु श्लोक व त्यांचा अर्थ मोठ्या आवाजात म्हणावा ज्यामुळे मुलांवर त्याचा प्रभाव पडून ती त्यांच्या ध्येयाप्रति निष्ठावंत आणि सुसंस्कारी होतील.

# नारायण बलि

समाजामध्ये अकाल मृत्यु जेव्हा होतो तेव्हा त्या जीवाला सद्गति प्रदान करण्यसाठी नारायण-बलिची व्यवस्था आहे, ज्याचा आशय असा की नारायणा प्रति समर्पण! भगवान श्रीकृष्ण साक्षात् नारायण तर अर्जुन नर आहे. त्या नारायणाची उपासनाच सद्गति प्रदान करते. 'इति गुह्यतम् शास्त्रं' गीता हे अतिशय गोपनीय शास्त्र आहे, त्याच भगवान श्रीकृष्णांच्या मुखातून निघालेली वाणी आहे, संपूर्ण क्रमबद्ध साधन आहे, त्याचे नियमित पठण केले पाहिजे.

शोकाकुल समुदायाला शांति प्रदान करण्यासाठी हे पूजन अवश्य केले पाहिजे. दुर्घटनाग्रस्त जीवात्म्याच्या शांतिसाठी, त्या आत्म्याच्या कल्याणासाठी हे पूजन अवश्य करावे. त्याचबरोबर श्रीमद्भगवद्गीता समजण्यासाठी 'यथार्थ गीते' चे अखंड पठण मंगलकारी ठरेल.

*अनुरोध - सुसंस्कृत करणारे पुजेच्यावेळी म्हटले जाणारे श्लोक मराठी अर्थासहित ऐकविले जावेत. जेथे मराठी भाषा प्रचलनात नसेल तेथे त्या ठिकाणच्या भाषेमध्ये अनुवाद करून समजाविले जावेत. संस्कृत आता बोली भाषा राहिली नाही. विद्यार्थ्याला ज्या भाषेत समजेल त्या भाषेत श्लोकांचा भाव कायम राखत अर्थ समजाविला पाहिजे तरच कर्मकांडाचे उद्दिष्ट पूर्ण होईल आणि आपण सदैव श्रद्धेस पात्र व्हाल.*

**ॐ शान्ति! शान्ति!! शान्ति!!!**

# आदिशास्त्र गीता

'गीता' हे विश्वाचे आदिशास्त्र आहे. त्याच्या चौथ्या अध्यायात भगवान श्रीकृष्ण म्हणतात, "अर्जुना! कल्पाच्या आरंभी हा अविनाशी योग मी सूर्याला सांगितला. सूर्याने तो मनुला व मनुने इक्ष्वाकुला सांगितला. इक्ष्वाकुकडून राजर्षिंनी जाणला व त्यानंतर हा अविनाशी योग पृथ्वीवरून लोप पावला, तोच मी आता तुला सांगत आहे कारण तू माझा प्रिय भक्त व अनन्य सखा आहेस." सृष्टिचे प्रवर्तक असलेल्या मनुच्या समक्ष वेद प्रकट झाले, परंतु अविनाशी योगशास्त्र 'गीता' मात्र मनुने पिता सूर्याला संगितले गेले. अशाप्रकारे गीतेचा अविनाशी योग पद्मनाथ भगवंतांच्या श्रीमुखातून प्रथम प्रसारित झाला व त्यानंतर मनुच्या समक्ष वेद प्रसारित झाले. मनु वेदांचे ज्ञाता, गीतोक्त अविनाशी योगाचे संवाहक होते, ज्यामध्ये म्हटले आहे की ईश्वर एक आहे, त्यास प्राप्त करण्याचे साधन एक आहे तथा प्राप्त करण्याचा अधिकार सर्वांना सारखाच आहे. असे असताना भेद-भावाने भरलेली स्मृति लिहून ते समाजात फूट कसे पाडतील.

अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम्।। (गीता ९/३३). अर्जुना! तू सुखरहित, क्षणभंगुर असे हे दुर्लभ मानव शरीर प्राप्त करून माझे स्मरण कर. देवांनाही असे दुर्लभ असलेल्या मानव शरीराची सार्थकता केवळ ईश्वर प्राप्तिमध्येच आहे. गीतेच्या ह्या संदेशाचे ज्ञाता असलेले मनु मानव शरीराला अस्पृश्य कसे म्हणतील?

प्रतीत होते की मनु महाराजांच्या प्रति जनमानसात अतूट श्रद्धा पाहून काही परिस्थितींमध्ये ह्या महापुरुषांच्या नावावर सांगितल्या गेलेल्या स्मृतिच्या द्वारे सामाजिक व्यवस्थानांच 'धर्म' म्हटले गेले, वास्तविक त्यांचा महापुरुषांशी काहीही संबंध नव्हता. तेव्हा मनुवाद एक भ्रांति आहे.

**- स्वामी अड़गड़ानन्द**

**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**

**न्यू अपोलो ईस्टेट, गाळा नं. 5, मोगरा लेन,(रेलवे सब-वे च्या जवळ), अंधेरी पूर्व, मुम्बई - 400069 भारत.**

**फोन : (091-22) 2825 5300 ईमेल** : contact@yatharthgeeta.com

**वेबसाइट** : www.yatharthgeeta.com